# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३५४ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये

## मंदिर परिसरात १५८ फूट उंच हनुमान मूर्ती निर्मितीचे काम पूर्णत्वाकडे

## श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसराचा विकास : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**नागपूर, दि १५:** कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर परिसर आता भक्ती व आध्यात्मिक केंद्रासह कौशल्य वैकास आणि गौरवशाली भारताच्या ऐतिहासिक पाऊलखुणांना अधोरेखित करणाऱ्या भारत मंडपमसह कौशल्य विकास व महिला सक्षमीकरणाचे एक परिपूर्ण व्यापक संकुल म्हणून नावारूपास येत आहे. मागील काही वर्षांपासून संस्थान परिसरात लहान उपक्रमातून सुरु झालेली सुरुवात आता सुमारे ५०० मुलामुलींच्या निवासव्यवस्थेसह कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून पुढे येईल. गत काही महिन्यांपासून माविम मार्फत संस्थानने सुरु केलेल्या रेडिमेड गारमेंट क्लस्टरने अनेक महिलांचा आत्मविश्वास वाढविला आहे. येथील अगरबत्ती व इतर व्यवसाय व कौशल्य प्रशिक्षणानंतर अनेक महिलांना रोजगार उपलब्ध झाला असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसरात नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) आणि नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती माध्यमांना व्हावी या उद्देशाने त्यांनी क्षेत्रभेट व प्रतिनिधींशी संवाद साधला. मंदिर परिसरातील तलाव क्रमांक-३मध्ये भारतातील भव्य व उंच म्हणून गणल्या जाणाऱ्या १५८ फूट उंचीच्या आरसीसी हनुमान मूर्ती स्थळाच्या कामाची पाहणी करून याबाबत त्यांनी माहिती दिली. या संपूर्ण तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी शासनाने २१४ कोटी ९४ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. येथे उभारण्यात येत असलेल्या वीर हनुमानाच्या भव्य मूर्तीचा पाया महानिर्मितीद्वारे तयार करण्यात आला आहे. मूर्ती पूर्ण झाल्यावर त्यावर आकर्षक 'लेझर प्रोजेक्शन मॅपिंग' आणि तलावामध्ये 'अंडर वॉटर लायटिंग' करण्याचे प्रस्तावित आहे.

# चौथी राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद २०२६ संपन्न

## पर्यावरण हा असा विषय आहे जो संपूर्ण जगासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे : राहुल नार्वेकर

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५**

विकासार्थ विद्यार्थी आणि पर्यावरण संरक्षण गतिविधी यांच्या संयुक्त तत्वज्ञानातून आयोजित राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद २०२६ चे समारोप आज नागपूरच्या विधानभवनाच्या गरिमामय वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले.



समारोप सत्रात महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर मुख्य अतिथी म्हणून तर पद्मश्री जनार्दनपंथ बोथे विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित होते. या पर्यावरण युवा संसदेत देशभरातील विविध विद्यापीठांमधून आलेल्या २०० युवा प्रतिनिधींनी पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि जनसहभाग यांसंबंधित महत्त्वपूर्ण विषयांवर आपले विचार व प्रस्ताव मांडले. कार्यक्रमादरम्यान जल, जंगल, जमीन, जनावर आणि जन यांच्या समन्वित संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. या संसदेत दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये भारताच्या पंचआयामी परिवर्तन आणि हवामान शासनात पारिस्थितिक बुद्धिमत्तेचा उपयोग तसेच उजझ ३० मध्ये भारत आणि जगाची भूमिका भारतीय सभ्यतागत स्थैर्याच्या मूल्यांवर आधारित जागतिक हवामान नेतृत्व या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सत्र क्रमांक १ दरम्यान गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी युवांना मार्गदर्शन केले. समारोप सत्रात युवांना संबोधित करताना राहुल नार्वेकर यांनी राष्ट्रनिर्माण आणि पर्यावरण संरक्षणासाठी युवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले आणि शाश्वत विकासासाठी नेतृत्वकारी भूमिका निभावण्याचे आवाहन केले.

त्यांनी सांगितले की, पर्यावरणाचे संरक्षण करणे हा आपला धर्म आहे आणि पर्यावरण संवर्धनात जनतेचा सहभाग अत्यावश्यक आहे. भारताची युवा पिढी सक्षम झाली तर भारत सर्वार्थाने उत्कृष्ट बनू शकतो. विशिष्ट अतिथी पद्मश्री जनार्दनपंथ बोथे यांनी सेवा आणि समर्पणाच्या माध्यमातून निसर्ग संरक्षण पुढे नेण्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

तसेच उत्कृष्ट सादरीकरणांना गौरविण्यात आले. दोन दिवसीय या राष्ट्रीय पर्यावरण युवा संसदेमुळे युवांमध्ये पर्यावरणीय जागरूकता निर्माण होऊन शाश्वत भारताच्या निर्मितीकडे एक प्रभावी संदेश देण्यात आला. या प्रसंगी डॉ.आशुतोष मडावी (राष्ट्रीय उपाध्यक्ष), राहुल गौड (राष्ट्रीय प्रमुख, विकासार्थ विद्यार्थी), कु.पायल राय (अखिल भारतीय संयोजक, विकासार्थ विद्यार्थी) तसेच डॉ. विजय खंडाल (अध्यक्ष, विद्यार्थी विकास विभाग) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# तुमची लोकल आमचा जीव घेतेय !

## 'धर्मवीर' फेम अथर्व वगळचे मुख्यमंत्र्यांना जळजळीत पत्र



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**ठाणे, दि. १५**

डोंबिवली येथील रहिवासी असलेल्या आणि १२ वीचा पहिला पेपर देण्यासाठी उपनगरीय रेल्वेगाडीने कळवा येथे निघालेल्या सोहम कटरे या १८ वर्षाच्या परीक्षार्थीचा मृत्यू रेल्वे अपघातात झाला. या अपघातानंतर आता प्रवासी, विविध संघटनांकडून रेल्वेतील गर्दीविषयी प्रश्न विचारले जात आहे.ठाण्यातील एका अभिनेत्यानेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र लिहून प्रवासी म्हणून होणारा त्रास पत्रात मांडला. चित्रपटाच्या शूटिंग, महाविद्यालयात जाताना रेल्वे प्रवासा दरम्यान येणाऱ्या अडचणी या अभिनेत्याने पत्रात मांडल्या आहेत. डोंबिवली येथे राहणाऱ्या सोहम कटरे या परिक्षार्थीचा कळवा-मुंब्ररेल्वे स्थानका दरम्यान परिक्षा केंद्रावर जाताना मृत्यू झाला. उपनगरीय रेल्वेगाडीतील गर्दीमुळे तोल जाऊन सोहमचा मृत्यू झाल्याचा आरोप प्रवासी संघटनांकडून केला जात आहे. ठाणे रेल्वे स्थानकाबाहेर प्रवासी संघटनांनी सोहमला श्रद्धांजली देखील वाहिली.

त्याच्या मृत्यूनंतर रेल्वे अपघाताचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

दरम्यान, शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या जीवनपटावर आधारीत धर्मवीर चित्रपटात खासदार श्रीकांत शिंदे यांच्या बालपणाची भूमिका करणाऱ्या अर्थव जयेश वगळ या अभिनेत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीले आहे.

**काय म्हटले पत्रात**

अथर्व याने त्याच्या पत्रात म्हटले की, डोंबिवली येथील १८ वर्षीय विद्यार्थी सोहम सचिन कटरे याला कळवा आणि मुंब्रा स्थानकांदरम्यान गर्दीने भरलेल्या लोकल ट्रेनमधून पडून आपला जीव गमवावा लागल्याच्या दुःखद घटनेबद्दल मी हे पत्र खोलवर दुःख आणि गंभीर चिंतेने लिहित आहे. सोहम सकाळी बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी त्याचे परीक्षेचे साहित्य घेऊन घरी निघाला होता आणि दुर्दैवाने तो मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये प्रचंड गर्दीचा बळी पडला हे हृदयद्रावक आहे. या घटनेने पुन्हा एकदा मध्य रेल्वे मार्गावरील जीवघेण्या गर्दीचे प्रमाण अधोरेखित केले आहे आणि हे लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे की पश्चिम आणि हार्बर मार्गावरही दररोज अशाच धोकादायक गर्दीचा सामना करावा लागतो.

मी अथर्व वगळ, विद्याविहार येथील सोमय्या महाविद्यालयातील एक विद्यार्थी तथा मराठी, हिंदी चित्रपट, मालिका, वेब सीरीज व जाहिरात क्षेत्रात काम करणारा एक अभिनेता ही आहे. ठाण्यात वास्तव्यास आहे आणि मी दररोज अशाच गर्दीच्या आणि धोकादायक परिस्थितीत महाविद्यालय व शुटिंगला जाण्यासाठी आणि घरी परतण्यासाठी प्रवास करतो. माझ्यासारखेच, हजारो विद्यार्थी दररोज मुंबईतील जीवघेण्या गर्दीच्या लोकल ट्रेनमधून फक्त कॉलेज, शाळा आणि कोचिंग क्लासेसमध्ये जाण्यासाठी प्रवास करतात.

# सरकारी घरकुलांना मिळणार सौर ऊर्जा अनुदानाचा लखलखाट

**वृत्तसंस्था**
**अहिल्यानगर, दि. १५**

पंतप्रधान आवास योजनेला (ग्रामीण टप्पा-२) मंजुरी देतानाच राज्य सरकारने या घरकूल योजनेच्या अनुदानातही ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढीव अनुदानातील ३५ हजार रु. घरकुलाच्या बांधकामासाठी व १५ हजार रु. पंतप्रधान सुर्यघर योजनेंतर्गत सौरऊर्जा यंत्रणेसाठी दिले जाणार आहेत. याशिवाय केंद्र सरकारने सौर ऊर्जेसाठी आणखी ३० हजार रू. उपलब्ध होणार आहेत. यामुळे घरकुल योजनेत सौर ऊर्जा योजनेसाठी सरकारकडून एकूण ४५ हजार रु. तर लाभार्थीचा स्वहिस्सा ५ हजार रू. भरावा लागेल. मात्र यातून सरकारी घरकुलांना सौर ऊर्जेचा झगमगाट लाभणार आहे.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून ही माहिती उपलब्ध झाली. यापूर्वी राज्यात पंतप्रधान आवासचा ग्रामीण टप्पा-१योजना सन २०१६-१७ ते २०२१-२२या कालावधीत राबवला होता. त्यावेळी योजनेत सपाट भागांसाठी प्रति घरकूल १ लाख २० हजार रु. तर डोंगराळ- कठीण भागांसाठी १ लाख ३० हजार रु. इतकी अनुदान लाभार्थ्याला देण्यात आले होते. आता राज्य सरकारने ग्रामीण टप्पा-२सन २०२४-२५ते २०२८-२९ राबवताना लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ केली आहे. राज्याच्या हिस्स्यातून अतिरिक्त अनुदान ५० हजार रु. देण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यात ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना स्वतःचे घर उभारण्यासाठी त्याची मोठी मदत होणार आहे. राज्य सरकारने वाढ केलेल्या ५० हजारांच्या अनुदानातील ३५ हजार रु. बांधकामासाठी तर १५ हजार रु. पंतप्रधान सूर्यघर योजनेंत सौरऊर्जा यंत्रणेसाठी दिले जाणार आहेत. यासह केंद्र सरकार ३० हजार रुपयांचे अनुदान घरकुल लाभार्थ्यास सौर योजनेसाठी देणार आहे तसेच लाभार्थ्यास स्व:तकडील ५ हजार असे एकूण ५० हजार रु. सौर ऊर्जा योजनेसाठी मिळणार आहेत.



## सुटीची सूचना

महाशिवरात्रीनिमित्त सोमवार दि. १६ फेब्रुवारी२०२६ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही.

सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

■ व्यवस्थापक

## तेजस ठाकरे यांची प्रकृती बिघडली रुग्णालयात दाखल

**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे पुत्र तेजस ठाकरे यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे त्यांच्यासोबत रुग्णालयात असून तेजस यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे समजते.तेजस ठाकरे यांची प्रकृती खालावल्याने त्यांना गिरगाव येथील रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तिथे त्यांच्यावर उपचार सुरू असून स्वतः उद्धव ठाकरे यांनी रुग्णालयातील डॉक्टरांशी चर्चा केली. तेजस ठाकरे यांच्यावर बुधवारपासून करण्यात येत असलेल्या उपचारांनंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे सांगण्यात आले. येत्या दोन दिवसांत त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात येणार असल्याचे समजते.तेजस ठाकरे हे उद्धव ठाकरे यांचे धाकटे पुत्र आहेत.

## सशक्त समाजनिर्मितीसाठी नागरिकांमध्ये कायद्याविषयक जागरूकता आवश्यक : न्यायमूर्ती अनिल किलोर

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास बहुमोल असे संविधान दिले. संविधानाने नागरिकांना अधिकार दिले. राज्यघटनेतील तरतुदीनुसार शासकीय योजना आकारास आल्या. यातून प्रत्येकाला विकासाची संधी दिली. या योजना आपल्या विकासाचा मार्ग देणाऱ्या आहेत ही भावना व जाणीव सर्वसामान्य नागरिकांमध्ये व्हावी यासाठी हे विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी योजनेचा लाभ घेताना ती यशस्वी व्हावी अशी मनोभूमिका ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी केले. भिवापूर तालुक्यातील नक्षी येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन करण्यात आले.

# चोरट्यांनी न्यायाधीशांच्याच निवासस्थानी केली चोरी

## बाहेरगावी असल्याने घराला होते कुलूप

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**अमरावती, दि. १५**

शहरातील सुरक्षित समजल्या जाणाऱ्या कांतानगर भागात चोरट्यांनी न्यायाधीशांच्या निवासस्थानांना लक्ष्य केले. न्यायाधीशांच्या या वसाहतीत चोरट्यांनी शनिवारी मध्यरात्रीनंतर चांगलाच धुमाकूळ घातला. विशेष म्हणजे प्रवेशद्वाराजवळ पोलिसांचा खडा पहारा असतानाही चोरट्यांनी पाच न्यायाधीशांसह चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरी केली. या धाडसी चोरीच्या तपासाचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. शनिवारी आणि रविवारी सलग दोन दिवस न्यायालयाला सुटी असल्याने अनेक न्यायाधीश आणि कर्मचारी बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी याचाच फायदा घेत या परिसराची आधीच 'रेकी' केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. ज्या घरांना कुलूप होते, अशीच घरे चोरट्यांनी अचूकपणे लक्ष्य केली.चोरीचा थरार आणि घटनाक्रमकांतानगर परिसरात नलदमयंती आणि पैनगंगा अशा दोन वसाहती आहेत. नलदमयंती या नवीन इमारतीमधील तीन न्यायाधीशांच्या घरी चोरी करण्यात आली, तर बाजूलाच असलेल्या पैनगंगा या इमारतीतील दोन न्यायाधीशांची घरे फोडण्यात आली. न्यायाधीशांच्या घरांसोबतच पाठीमागे असलेल्या वसाहतीतील चार कर्मचाऱ्यांच्या घरांचेही कुलूप तोडण्यात आले. चोरीच्या घटनेची माहिती मिळताच सकाळी पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे यांच्यासह फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. सीसीटीव्ही चित्रिकरणात चोरटे हे वसाहतीच्या मागील बाजूने झुडूपांचा आधार घेत भिंतीवरून उडी मारून पळताना दिसत आहेत. या घटनेत किती ऐवज चोरीला गेला.

## गोंदिया जिल्ह्यातील विविध घटनेत चौघांचा मृत्यू

**गोंदियाः** तलावावर बैल धुण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा एका बैलासह तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता सुमारास गोंदिया तालुक्यातील खातिया येथे घडली. महेंद्र बाबुराव कवरे (वय ४७) रा. खातिया असे तलावात बुडून मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.रावणवाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खातिया येथील शेतकरी महेंद्र कवरे हे शनिवारी दुपारी गावापासून काही अंतरावर असलेल्या माता मंदिर तलाव येथे बैलांना धुण्यासाठी घेऊन गेले होते. बैलांना धुतल्यानंतर त्यांना बैलबंडीला जुंपून बाहेर काढत असताना बैलबंडीचा तोल गेल्याने महेश कवरे हे बैलबंडीसह तलावात बुडाले.

# तालिबानने उद्धवस्त केलेली बमियानची बुद्धमूर्ती नागपुरात उभारणार

## स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी....

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५**

अफगाणिस्तानमधील बमियान बुद्ध मूर्ती या प्राचीन जगातील एक अद्वितीय सांस्कृतिक वारसा मानल्या जात होत्या. मध्य अफगाणिस्तानातील बमियान खोऱ्यात, काबूलपासून सुमारे २३० किलोमीटर वायव्येला, डोंगराच्या उभ्या कड्यात कोरलेल्या बुद्धाच्या दोन विशाल मूर्ती येथे उभ्या होत्या. यांपैकी एक मूर्ती सुमारे ५५ मीटर तर दुसरी सुमारे ३८ मीटर उंच होती. इ.स. पाचव्या ते सहाव्या शतकाच्या दरम्यान या मूर्तींची निर्मिती झाली असून त्या काळात बमियान हे बौद्ध धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र होते. या मूर्ती गांधार कला शैलीचा उत्कृष्ट नमुना होत्या. डोंगरात कोरीव काम करून त्यावर माती, चुन्याचा थर व रंगकाम करण्यात आले होते.मूर्तींभोवती अनेक बौद्ध विहार, गुहा व भित्तिचित्रे होती, ज्यांमधून त्या काळातील धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडत होते. बमियान खोरे हे रेशीम मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे विविध संस्कृतींचा आणि धर्मांचा संगम झाल्याचेही दिसून येते. मार्च २००१ मध्ये तालिबानने या मूर्ती इस्लामविरोधी असल्याचे कारण देत स्फोटके व तोफांच्या सहाय्याने नष्ट केल्या.या घटनेमुळे संपूर्ण जगात तीव्र निषेध व्यक्त झाला आणि मानवजातीच्या सांस्कृतिक वारशावर झालेला हा मोठा आघात मानला गेला. पुढे २००३ मध्ये बमियान खोरे आणि त्यातील अवशेषांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. आज जरी बमियानच्या बुद्धमूर्ती अस्तित्वात नसल्या, तरी त्यांच्या रिकाम्या कोनाड्यांतून त्या वैभवशाली इतिहासाची साक्ष मिळते.

## भारत ८, पाकिस्तान १

# पाकिस्तानला चारमुंड्या चित करत भारत सुपर-८ मध्ये

**कोलंबो, दि. १५ :** महाशिवरात्रीचा मुहूर्त आणि समोर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान... अशा हायव्होल्टेज वातावरणात टीम इंडियाने आपल्या नावाचा डंका वाजवला आहे. श्रीलंकेच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या थरारात सूर्यकुमार यादवच्या यंग ब्रिगेडने पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासोबतच भारताने दिमाखात सुपर-८मध्ये धडक मारली असून पाकिस्तानच्या विश्वचषकातील आशा आता अधांतरी आहेत.

**इशान किशनने केल्या ७७ धावा**

**ईशान किशनचा तांडवा**

प्रथम फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी पाकिस्तानी गोलंदाजीची पिसे काढली. ईशानने ४० चेंडूत १० चौकार आणि तीन षटकारांसह ७७ धावा केल्या, तर कर्णधार सूर्यकुमार यादवने २९ चेंडूत तीन चौकारांसह ३२ धावा केल्या. यामुळे भारताने निर्धारित २० षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १७५ धावांचा आव्हानात्मक डोंगर उभा केला.



**पाकिस्तानची फलंदाजी सुपर फ्लॉप :** विजयासाठी १७६ धावांचं आव्हान मिळालं असताना पाकिस्तानचे फलंदाज मैदानात उतरले. मात्र पहिल्याच ओव्हरमध्ये हार्दिक पंड्याने साहिबजादा फरहानला शून्यावर बाद केले. त्यानंतर पाकिस्तानची फलंदाजी ढासळतच गेली आणि ७८ धावांपर्यंत त्यांनी ७ विकेट्स गमावल्या. पाकिस्तानकडून उस्मान खानने ४४, शाहीन आफ्रिदीने २३, शादाब खानने १४ तर फहीम अश्रफने १० धावा केल्या.

# आशा सेविकांच्या संघर्षाला सन्मानाची किनार

## डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या पुढाकारातून दिंद्रुड येथे पैठणी देऊन गौरव, अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची भावनिक साक्ष



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**बीड, दि. १५**

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या आशा सेविकांच्या संघर्षाला सन्मानाची किनार देत त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा भावनिक व प्रेरणादायी सन्मान सोहळा माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे पार पडला. देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या भव्य ‌आशा सन्मान सोहळ्या‌त आशा सेविकांना अस्सल पैठणी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी आशा सेविकांच्या संघर्षाचे आणि सेवाभावाचे मनापासून कौतुक करताना, त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याचे कार्य डॉ. ओमप्रकाश शेटे प्रामाणिकपणे करत असल्याचे प्रतिपादन केले.

कोविडसारख्या कठीण काळातही आशा सेविकांनी जीव धोक्यात घालून घराघरांत जाऊन तपासणी, जनजागृती आणि रुग्णसेवा केली. मात्र असे असूनही शासकीय व सामाजिक पातळीवर त्यांची उपेक्षा होत असल्याची खंत व्यक्त करत वर्षा उसगावकर म्हणाल्या की, आशा सेविका या समाज आणि आरोग्य विभाग यांच्यातील जिवंत दुवा आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सन्मान करण्याची संकल्पनाच माणुसकी जपणारी आहे. मोठ्या पदावर कार्यरत असतानाही कोणताही अभिनिवेश न बाळगता उपेक्षित घटकांसाठी झटणाऱ्या डॉ. शेटे यांच्या कार्यातून त्यांचा मनाचा मोठेपणा दिसून येतो, असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ओमप्रकाश शेटे, अध्यक्ष -आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती, हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई रोटरीचे माजी गव्हर्नर ेंद्र अगरवाल, चाइल्ड हेल्प फाउंडेशनचे मुख्य ट्रस्टी राजेंद्र पाठक, सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण आणि तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर घुबडे, उद्योजक शिल्पा शेटे यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी हजारो महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याच सन्मान सोहळ्यात आशा सेविकांच्या जीवनकार्यावर आधारित 'आशा' या चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला होता.

तसेच डॉ. शेटे यांच्या आवाहनावरून गरीब बालके व रुग्णांसाठी सातत्याने मदत करणाऱ्या राजेंद्र अगरवाल आणि राजेंद्र पाठक यांचा विशेष सन्मान करण्यात आला. देवदूत प्रतिष्ठान व खोलेश्वर परिवार, दिंद्रुड यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले, तर प्रस्तावना डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मांडली. आभार प्रदर्शन देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी बीड जिल्ह्यात वाढत चाललेल्या सामाजिक दरीबद्दल चिंता व्यक्त करत अशा उपक्रमांमधून ही दरी सांधण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शिकवणीनुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगत, आशा सेविकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांकडे प्रामाणिकपणे आग्रह धरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पावलावर पाऊल ठेवत

राज्यात प्रशासन, विकास आणि संवेदनशीलतेचा समतोल साधत काम करण्याची दिशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिली आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सामाजिक बांधिलकी जपत तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणारे उपक्रम राबवण्याचे काम डॉ. ओमप्रकाश शेटे प्रामाणिकपणे करत आहेत. शिस्तबद्ध नियोजन, निर्णयक्षमता आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची ही कार्यपद्धती राज्याच्या दृष्टीने अत्यंत हितकारक ठरत आहे. अशा लोकाभिमुख कामकाजामुळे केवळ प्रशासन बळकट होत नाही, तर समाजात विश्वास, स्थैर्य आणि सकारात्मक बदलांची पायाभरणीही होते. बिडचा विकास करणारा माणूस म्हणून डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्याकडे अवघा बिड जिल्हा पाहतोय अशा अनेकांच्या भावना कार्यक्रम स्थळी होत्या.

युवाराष्ट्र दर्शन
चंद्रपूर जिल्हा
सोमवार दि.१६ फेब्रुवारी २०२६


## कमल स्पोर्टींग क्लबचा स्तुत्य उपक्रम ; महाशिवरात्री निमित्त भाविकांना साबुदाणा खिचडी वाटप



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** महाशिवरात्रीच्या पवित्र, पावन सणानिमित्त प्रदेश भाजयुमोचे युवा नेते तथा कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर सन २०१६ पासून सातत्याने भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करीत असून यंदाही महाशिवरात्री निमित्त दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अंचलेश्वर गेटजवळील श्री अंचलेश्वर मंदिर परिसरात भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. सकाळी ०६.०० वाजता श्री अंचलेश्वर मंदिरात शिवलिंगाचे पुजन करून उपस्थित भाविकांना प्रसाद वितरीत करण्यात आले. पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराजजी अहीर यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते शिवभक्तांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजपा नेते खुशाल बोंडे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहीर, किसान मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष राजु घरोटे, पुनम तिवारी, सरीता घटे, गौतम यादव, सुभाष आदमने, सलीम शेख मामु, राजेश वाकोडे, कमल कजलीवाले, मयुर भोकरे, स्वप्निल मुन, राहुल गायकवाड, आशय चंदनखेडे, ललीत गुलानी, जगदीश दंडेले, संतोष दिकोंडवार, प्रविण चुनारकर व कमल स्पोर्टींग क्लबचे सहकारी उपस्थित होते.या साबुदाणा खिचडीचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला.

# ३०० वर्षे पुरातन महाशिवलिंग स्थळी १०८ दांपत्यांच्या हस्ते महाआरती

## स्थळाच्या विकासाला गती देणार - आ.किशोर जोरगेवार



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** महाशिवरात्री महोत्सवानिमित्त लालपेठ, भिवापूर वार्ड येथील सुमारे ३०० वर्षे पुरातन आणि महाराष्ट्रातील सर्वात विशाल महाशिवलिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र स्थळी आज सकाळी १०८ दांपत्यांच्या हस्ते भव्य महाआरती पार पडली. वेदमंत्रांच्या गजरात आणि 'हर हर महादेव'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या सोहळ्यास आमदार किशोर जोरगेवार सहपत्नीक उपस्थित होते. तसेच हंसराज अहिर (अध्यक्ष, राष्ट्रीय ओबीसी आयोग), मनीष महाराज, भाजप नेते अशोक जीवतोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी आमदार किशोरभाऊ जोरगेवार म्हणाले की, महाशिवरात्री हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा सण आहे. ३०० वर्षांची परंपरा लाभलेल्या या महाशिवलिंग स्थळी रुद्राभिषेक करण्याचे भाग्य लाभणे ही आनंदाची बाब आहे. या ठिकाणचा आध्यात्मिक वारसा जपणे आणि भाविकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.मागील श्रावण महिन्यात येथे भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या माध्यमातून अनेक वर्षे नजरेआड राहिलेल्या या प्राचीन आणि जागृत शिवलिंगाची ओळख राज्यभर पोहोचली.श्रावणातील कार्यक्रमास अमृता फडणवीस यांनी उपस्थित राहून विधीवत पूजा केली होती, ही या स्थानाच्या वाढत्या धार्मिक महत्त्वाची साक्ष असल्याचे त्यांनी नमूद केले.चंद्रपूरच्या धार्मिक वैभवात भर घालणारे हे स्थान असून, त्याचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. भाविकांसाठी अधिक सोयी-सुविधा निर्माण करणे, परिसर सुशोभित करणे आणि आध्यात्मिक वारसा जपणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाशिवरात्रीनिमित्त आमदार किशोरभाऊ जोरगेवार यांच्या संकल्पनेतून महाशिवलिंग मंदिर सेवा समिती व मित्र संघ क्रीडा मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळच्या महाआरतीनंतर मनोकामना पूर्ती महारुद्राभिषेक पार पडला. त्यानंतर विविध भाषिक भजन मंडळांचे भजन कार्यक्रम झाले. उद्या महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याचा समारोप होणार आहे.

## रेकॉर्डवरील आरोपी 'शुटर' सरफरोजकडून रामनगर हद्दीतील ३ घरफोड्या उघड

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; २१ लाख १९ हजाराचा मुद्देमाल जप्त



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत पोस्टे रामनगर हद्दीतील तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या प्रकरणी रेकॉर्डवरील आरोपी मो. सरफरोज सगीर शहा उर्फ 'शुटर' (वय २५, रा. आमटे लेआउट, रयतवारी कॉलरी, चंद्रपूर) व सद्दाम मुस्ताक शेख (वय ३०, रा. बँक ऑफ इंडिया मागे, घुग्घुस) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी च्या निर्देशानुसार चंद्रपूर शहरात प्रोव्हीशन, जुगार रेड, मोटारसायकल चोरी व घरफोडी गुन्ह्यातील आरोपींची तपासणी सुरू होती. पेट्रोलिंगदरम्यान गापनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सरफरोज याने पोस्टे रामनगर हद्दीतील इंदिरानगर परिसरात घरफोडी केली आहे.माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेऊन दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी रामनगर पोलीस ठाणे हद्दीतील इंदिरानगर, कृष्णानगर व शामनगर परिसरात तीन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून एकूण २१ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीनही गुन्हे उघडकीस आले आहेत.दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी रामनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. यामध्ये पोउपनि. विनोद भुरले, पोउपनि. सुनील गौरकार तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी आणि सायबर पोलीस स्टेशनचे अधिकारी-कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

## महापौर व उपमहापौरांकडून साबुदाणा खिचडी व फळ वाटप

### महाशिवरात्री निमित्त श्री अंचलेश्वर मंदिर परिसरात भक्तसेवा



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त चंद्रपूर शहरात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर श्री अंचलेश्वर मंदिर परिसरात महापौर व उपमहापौर यांच्या हस्ते साबुदाणा खिचडी व फळ वाटपाचा सेवा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव तसेच नवनिर्वाचित नगरसेवक व भाजप पदाधिकारी सहभागी झाले. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या उपवासधारक भाविकांना साबुदाणा खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले.यावेळी महापौर संगीता खांडेकर यांनी सांगितले की, महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर चंद्रपूरच्या धार्मिक-सामाजिक परंपरेला साजेशा सेवा उपक्रमाचे आयोजन करण्याचा पुण्ययोग भगवान महादेवाच्या कृपेने लाभला. सेवा, श्रद्धा आणि समर्पणातून समाजहिताची साधना अखंड सुरू राहो, हीच महादेवाच्या चरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी नमूद केले.मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे महाशिवरात्रीचा उत्साह अधिक वृद्धिंगत झाला.

## पोलीस भरती प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या सेन्सरची तातडीने तपासणी करा

### आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या चंद्रपूरचे पोलिस अधीक्षकांना सूचना

### तांत्रिक बिघाडाचा फटका सक्षम उमेदवारांना ; प्रारंभबिंदूवरही सेन्सर बसवण्याची मागणी



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** चंद्रपूर येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत १०० मीटर धावण्याच्या परीक्षेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या सेन्सरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याच्या तक्रारींची तात्काळ दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पोलिस अधीक्षकांना पत्र लिहून लक्ष वेधले आहे. या बिघाडामुळे अनेक सक्षम व सुदृढ उमेदवारांना १५ पैकी केवळ ४, ६ किंवा ८ असे अत्यल्प गुण मिळत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले की, धावण्याच्या परीक्षेत वापरलेले सेन्सर तांत्रिकदृष्ट्या अचूक नसल्याने उमेदवारांवर अन्याय होत आहे. तसेच धावण्याच्या प्रारंभबिंदूवर सेन्सर नसल्यामुळे वेळेचे अचूक मोजमाप होत नसून उमेदवारांमध्ये संभ्रम व नाराजी वाढत आहे. इतर जिल्ह्यांत उमेदवारांना १५ पैकी १३ ते १५ गुण मिळत असताना, चंद्रपूरमध्ये तुलनेने अत्यल्प गुण मिळत असल्याने स्थानिक उमेदवारांमध्ये असंतोष असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर धावण्याच्या परीक्षेत वापरले जाणारे सेन्सर तातडीने तपासावेत, आवश्यक असल्यास बदलण्यात यावेत आणि प्रारंभबिंदूवरही सेन्सर बसवून अचूक मोजमाप सुनिश्चित करावे, अशी ठाम मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असेही त्यांनी अधोरेखित केले.आ.मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार त्यांचे स्वीय सहाय्यक सतीश जोशी व लक्ष्मण शेंडे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर केले. पोलिस अधीक्षक मूमक्का सुदर्शन हे नागभीड दौऱ्यावर असल्याने एसडीपीओ चौगुले यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी उमेदवारांच्या शिष्टमंडळाशी आ. मुनगंटीवार यांनी दूरध्वनीवर संवाद साधत कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही, असे आश्वासन दिले. तसेच पोलिस अधीक्षकांनीही प्रतिनिधींशी दूरध्वनीवर चर्चा करून पूर्ण खबरदारी घेण्याचे आश्वासन दिले.हे प्रकरण गांभीर्याने हाती घेतल्याबद्दल उमेदवारांनी आ.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.

## भद्रनाग देवस्थान परिसरात साबुदाणा खिचडी वाटप



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**भद्रावती दि.१५ :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भद्रावती नगरीत भक्तीमय वातावरणात विविध धार्मिक उपक्रम पार पडले. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जि. चंद्रपूर शाखा भद्रावती यांच्या वतीने येथील भद्रनाथ देवस्थान परिसरात उपवास करणाऱ्या भाविकांसाठी शाबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. 'हर हर महादेव'च्या जयघोषात शिवभक्तांनी अभिषेक, पूजन व मंत्रजप करत भगवान शंकराची आराधना केली. भक्तीपूर्ण वातावरणात आयोजित खिचडी वाटप उपक्रम भाविकांसाठी आधारवटिका ठरला. अनेकांनी या सेवाकार्यासाठी आयोजकांचे आभार मानले.या प्रसंगी चंद्रपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांनी सदिच्छा भेट देऊन उपस्थिती दर्शविली. त्यांनी नागरिकांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा देत शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे मंदिर परिसरात विश्वासाचे वातावरण निर्माण झाले.जिल्हाध्यक्ष शंकर बोरघरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम सुरळीत पार पडला. तालुका अध्यक्ष संतोष शिवणकर, उपाध्यक्ष महेश निमसटकर, सुनील दैदावार, शाम चटपल्लीवार यांनी सेवाकार्यात सक्रिय सहभाग घेतला.तसेच माजी नगरसेवक अफझल भाई, इम्रान खान, समाजसेवक सूरज शहा, जयंता जवादे, अल्ताफ शेख, शुभम डोंगे आदी मान्यवर उपस्थित होते. विविध समाजघटकांनी एकत्र येऊन केलेल्या या उपक्रमातून समाजएकतेचा संदेश देण्यात आला.महाशिवरात्रीचा हा दिवस भद्रावतीत भक्ती, सेवा आणि विश्वास यांचा सुंदर संगम ठरला.

## महाशिवरात्रीनिमित्त शिवसेनेकडून साबुदाणा खिचडीचे वाटप



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भाविकांसाठी साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन सुजित पेंदोर यांनी केले होते.कार्यक्रमास चंद्रपूर शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.

शिवभक्तांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी शिवसेनेचे गटनेते तथा नगरसेवक राहुल वीरूटकर, महानगरप्रमुख सुरेश पचारे, उपजिल्हाप्रमुख प्रा. शालिक फाले, विधानसभा प्रमुख प्रमोद पाटील, नगरसेवक आकाश साखरकर, नगरसेविका सौ. मनस्वी संदीप गिऱ्हे, सौ. श्वेता विप्लव लांडगे, वसीम खान, राहुल भोयर, राजू बामनोटे, प्रकाश बोरसरे, कुणाल शिंगाडे, मिलिंद बावणे, रोशन काळबांधे, रुपेश बोबडे, अक्षय कंचर्लावार, महेश काळे, जय गवारले, कार्तिक पंधरे, तन्मय ब्राम्हणकर, अहर्त वाकडे, अनुज मोहुर्ले, श्रेयस उरकुडे, प्रशांत काढारकर, रुद्र उरकुडे, लोकेश प्रधान, सोहम ब्राम्हणकर आदी पदाधिकारी व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाशिवरात्रीच्या दिवशी उपवास करणाऱ्या भाविकांसाठी साबुदाणा खिचडीचे वाटप करून शिवसेनेकडून सामाजिक बांधिलकी जपली गेली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## चंद्रपूर जिल्हा तिरळे कुणबी समाजातर्फे महापौरांचा सत्कार



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१५ :** चंद्रपूर जिल्हा तिरळे कुणबी समाजाचे मागील ३० वर्षापासून समाजाचे अध्यक्ष असलेले राजेंद्र खांडेकर यांच्या पत्नी सौ. संगीता राजेंद्र खांडेकर या चंद्रपूर शहराच्या प्रथम नागरीक (महापौर) झाल्याबद्दल समाजातर्फे जंगी सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र खांडेकर, उपाध्यक्ष मोहन चौधरी, सचिव गजानन चौधरी, वामनरावजी गायकवाड, नानाभाऊ इंगोल, श्रीकांत करडभाजने, प्रमोद राऊत, संजय धोटे, सुनिल काळे व असंख्य समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

# शेतीमध्ये उत्पन्न वाढीसाठी मधमाश्यांचे महत्त्व - संजय मारणे

## मधमाशी पालन विषयावर जनजागृती कार्यक्रम उत्साहात



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.१५ :** शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असून फळबाग, भाजीपाला व तेलबिया पिकांच्या उत्पादनवाढीसाठी मधमाशी पालन हा प्रभावी पूरक व्यवसाय ठरू शकतो, असे प्रतिपादन पुणे येथील इंडियन नॅचरल हनीबीजचे संचालक संजय मारणे यांनी केले.

गांधी रिसर्च फाउन्डेशन आणि रैन इरिगेशन सिस्टम याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मधमाशी पालन जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सुमारे ४० सहभागी उपस्थित होते. जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन व सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी संजय मारणे यांनी मधमाश्यांचे विविध प्रकार, त्यांचे उपउत्पादने, परागीभवनाचे महत्त्व तसेच शेतीसाठी मधमाशी पालन कसे उपयुक्त आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.मधमाश्यांचे प्रमुख प्रकार तसेच डंखरहित मधमाश्या यांची माहिती देण्यात आली.(रॉक बी) या मोठ्या आकाराच्या मधमाश्या उंच झाडे किंवा इमारतींवर उघड्यावर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन जास्त असते ; मात्र त्यांचे नियंत्रित व्यवस्थापन करणे कठीण असते.(लिटल बी) या लहान आकाराच्या मधमाश्या झुडपांवर किंवा लहान फांद्यांवर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन तुलनेने कमी असले तरी परागीभवनात त्यांचा मोठा वाटा असतो.मधमाश्यांपासून मिळणारी मध, मेण , परागकण , रॉयल जेली, प्रोपोलिस आणि बी व्हेनम ही उपउत्पादने औषधी व आर्थिक दृष्ट्या महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. 'No Bees No Food' ही संकल्पना मांडत पर्यावरण संतुलनात मधमाश्यांची भूमिका अधोरेखित करण्यात आली.

मधमाशी पालनाची देखभाल, बॉक्स व्यवस्थापन, राणी मधमाशीचे महत्त्व, रोग नियंत्रण, हंगामी काळजी तसेच शेतीपूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन कसे फायदेशीर ठरते यावर सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमास यवतमाळ कृषी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रदीप वादाफळे, अमरावतीचे दिगंबर भुयार, नाशिकचे विजय चोंडेकर, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक पी.टी. पाटील, जामनेरचे प्रगतशील शेतकरी एस. आर. पाटील, जैन इरिगेशन कृषी विभागाचे संजय सोन्नजे, एनर्जी पार्क सीएसओ दिपक चौधरी, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सुधीर पाटील, लक्ष्मण देशमुख तसेच जैन इरिगेशन वन, वन्यजीव व पर्यावरण विभागाचे सल्लागार राजेंद्र राणे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ४० सहभागींकडून मधमाशी संरक्षणाची शपथ घेण्यात आली. 'मी मधमाश्यांचे संरक्षण करीन, पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन देईन, कीटकनाशकांचा योग्य व मर्यादित वापर करीन आणि 'No Bees No Food' हा संदेश समाजात पोहोचवीन,' अशी प्रतिज्ञा सहभागींनी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन राजेंद्र राणे यांनी केले. उपस्थितांनी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त केली.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**ब्रम्हपुरी दि.१५ :** तालुक्यातील खंडाळा गावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यातीथी सोहळा नुकताच संपन्न झाला.

मुक्ताक्षर जिपनविद्या कला केंद्र ब्रम्हपुरी च्या - वतीने संगीत संमेलन (भजनी मंडळ मेळावा) या कार्यक्रमात श्री गुरुदेव महिला मंडळ नान्होरी व रेणूका माता भजनी मंडळ धानोली पोहा चक यांनी राष्ट्रसंताची भजने गायीली.

खंडाळा गावातील भजनी मंडळ व गुरुदेव भक्तानी सायंकाळी राष्ट्रसंताना 'मौन' श्रध्दांजली वाहिनी व सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. प्रार्थनेचा विषयावर भास्कर वाघधरे महाराज यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. आरती व प्रसादा ने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाचे संयोजक कवि पांडुरंग डेंगे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच श्री माणिक -राखडे, मंगेश तलमले, अरुण कुये, आशिष डेंगे रलीराम तलमले, दिनेश राखडे यांनी सहकार्य केले.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन

३

# यवतमाळ

सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ जिल्हा

## जगदंबा मंदिर परिसरातून दुचाकी चोरी

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ

केळापूर येथील प्रसिद्ध जगदंबा मंदिराच्या परिसरातून दुचाकी चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी १२ फेब्रुवारीला झाल्याचे फिर्यादीतू नमूद आहे. केळापूर तालुक्यातील खैरगाव बुद्रूक येथील शेतकरी अतुल बाबूलाल चव्हाण (३५) हे जगदंबा मंदिरात आले होते. त्यावेळी त्यांनी परिसरात उभी ठेवलेली दुचाकी (एमएच २९ सीएल ७०७४) अज्ञात चोरट्याने लंपास केली. यात आपले ५९ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची फिर्याद अतुल चव्हाण यांनी पांढरकवडा पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-

गुलमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-

संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### ३७ हजारांची अल्युमिनियम तार लंपास

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ : सुरळीत वीज पुरवठ्यासाठी कंपनीचे कर्मचारी काम करीत असताना संधी साधून अज्ञात चोरट्याने तब्बल १६00 मिटर लांबीची अल्युमिनियम तारच कापून चोरुन नेली. हा प्रकार केळापूर तालुक्यातील करणवाडी ते राजूरवाडी रस्त्यादरम्यान घडला. करणवाडी ते राजूरवाडी दरम्यान अल्युमिनियम तारेद्वारे वीज उभारणीचे काम सुरु आहे. मात्र १२ ते १३ फेब्रुवारी दरम्यान चोरट्याने या कामावरील तब्बल ३७ हजार रुपये किमतीची तारच चोरुन नेल्याने कामावर विपरित परिणाम झाला आहे. चोरीचा प्रकार लक्षात येताच वीज अभियंता वैभव प्रदीपराव माकोडे (३०) रा. कोंढाळी ता. काटोल जि. नागपूर यांनी पांढरकवडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### वगदरा रोडवर रेतीचा ट्रॅक्टर पकडला

•युवाराष्ट्र दर्शनयवतमाळ : विनापरवाना रेतीचे उत्खनन करुन ती रेती चोरुन नेणारा एक ट्रॅक्टर पोलिसांनी पकडला. ही कारवाई वागदरा ते वणी रोडवर १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १.३0 वाजताच्या सुमारास करण्यात आली. पंकज राम गौरकार (३0) रा. वगदरा नवीन ता. वणी हा अवैधरीत्या एक ब्रास रेतीचे उत्खनन करुन नेताना पोलिसांना आढळला. यावेळी ट्रॅक्टर (एमएच २९ बीडब्ल्यू २२९६) आणि ट्रॉली (एमएच २९ सी ६३६८) तसेच त्यातील एक ब्रास रेती असा एकंदर ४ लाख ६ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. ही कारवाई वणी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने केली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी वानखेडे यांच्या फिर्यादीवरुन वणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंगाली डॉक्टरचा रुग्णांवर चुकीचा उपचार

## वडद येथील रुग्णाच्या किडनी व अंगावर सुज,पोलिसात तक्रार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, महागाव, दि. १५ फेब्रुवारी**

बोगस बंगली डॉक्टरच्या चुकीच्या उपचारामुळे एका विद्यार्थ्याला किडनी व अंगावर सुज येण्याच्या गंभीर आजाराला तोंड द्यावे लागत असुन पीडित मुलाच्या वडिलांनी याबाबत महागाव पोलिसात तक्रार दाखल केली असुन अद्याप गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती आहे.

महागाव तालुक्यात आरोग्य विभागाच्या वरद हस्ताने बोगस बंगाली डॉक्टरांचा रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असुन यावर आरोग्य विभागाचा कोणताच अंकुश नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झले आहे. तालुक्यातील वडद येथील बालाजी शिंदे यांनी आपला मुलगा अभिषेक याला ताप आला म्हणुन मुडाणा येथील बंगाली डॉक्टर यु. के. ठाकुर यांच्या कडे उपचारासाठी नेले असता त्यांनी अभिषेक यांना तपासून सलाईन लावले व इतर गोळ्या औषधे दिली. परंतु त्यानेही प्रकृतीमध्ये कुठलाच फरक पडला नसल्याने पुन्हा दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी शिंदे यांनी आपल्या मुलाला ठाकुर यांच्याकडे उपचारासाठी नेले. पुन्हा बंगाली डॉक्टर ठाकुर याने त्या मुलाला सलाईन व औषध, गोळ्या दिल्या परंतु काही वेळातच रुग्ण अभिषेक शिंदे याला मळमळ, उलट्या होवुन तब्येत बिघडल्याने त्याला महागाव व उमरखेड येथे उपचारासाठी नेले परंतु तब्येत चिंताजनक असल्याने उमरखेड येथील डॉक्टरांनी त्याला नांदेड येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येथील डॉक्टरांनी तपासणी करून रिपोर्ट पाहून शिंदे यांच्या मुलाला चुकीची औषधे व गोळ्या देण्यात आल्याने त्याच्या किडनी व संपुर्ण शरीरावर सुज आल्याचे निदान केले. व त्याची माहिती शिंदे यांना दिली.

त्यामुळे हे सर्व मुडाणा येथील बोगस बंगाली डॉक्टरच्या चुकीच्या उपचारामुळेच झाले असुन त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी याकरिता बालाजी शिंदे यांनी महागाव पोलिसात तक्रार दाखल केली असुन त्यावर अद्याप कोणताच गुन्हा नोंद करण्यात आला नसुन या अगोदर सुद्धा या डॉक्टरच्या चुकीच्या उपचारामुळे अनेक रुग्णांना दुर्धर आजाराला बळी पडून मृत्यूला कवटाळले असल्याच्या घटना घडल्या त्यामुळे आरोग्य विभागाच्या आशीर्वादाने रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या बोगस बंगाली डॉक्टरांच्या मुसक्या आवळण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

### तालुका दक्षता समिती नावालाच ?

**महागाव शहरासह तालुक्यातील बेलदरी , धारमोहा,मुडाणा, काळी(दौ), ईजनी,धनोडा , तिवरंग या गावांमध्ये बोगस डॉक्टरांचा रुग्णांच्या जीवाशी खेळ चालु असुन तालुक्यातील बोगस डॉक्टरांचा जीवघेणा खेळ थांबविण्याच्या उद्देशाने शासनाची दक्षता समिती असुन गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती असुन त्यामध्ये तालुका आरोग्य अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.या बोगस डॉक्टरांचे काळे कारनामे दिवसेंदिवस उघड होत असताना यावर कारवाई होणे अपेक्षित आहे.मात्र दक्षता समितीच याकडे दुर्लक्ष करीत असल्याने या मुन्नाभाईंचा रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरूच आहे.**

# संत सेवालाल महाराजांच्या जयघोषाने दुमदुमली धामणगांव नगरी



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दारव्हा, दि. १५ फेब्रुवारी**

दारव्हा तालुक्यातील धामणगांव देव येथे संत सेवालाल महाराज यांची 287 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम पार पडले. कार्यक्रमा नंतर सकाळी लगेच ध्वजपूजन, ध्वजारोहण गावाचे नायक व कारभारी व गावाची मान्यवरांच्या हस्ते पार पाडण्यात आले त्यानंतर धामणगावातील प्रमुख मार्गावरून दुचाकी रॅली व मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक जसे गावातील कुमारी अविवाहित मुली डोक्यावर कळस घेऊन गावभर मिरवणूक काढण्यात आली. मागील पाच सहा वर्षापासून धामणगांव नगरीमध्ये संपूर्ण बंजारा समाज बांधव मोठ्या उत्साहात जयंती साजरी करतात. त्याचबरोबर लगेच महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करून कार्यक्रम पार पाडण्यात आले तसेच गावातील युवक मंडळी यांनी अथक परिश्रम घेऊन सेवालाल महाराज यांच्या जयंती चा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

# खरूस खुर्द-टेंभूरदरा रस्त्यावर भीषण अपघात ; तरुणाचा मृत्यू

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १५ फेब्रुवारी**

खरूस खुर्द ते टेंभूरदरा दरम्यान झालेल्या एका भीषण रस्ता अपघातात २३ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. माधव मारुती बडेवार (वय २३ वर्ष, रा. बिटरगाव बु.) असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास खरूस खुर्द ते टेंभूरदरा रस्त्यावर अपघात झाल्याची माहिती फोनद्वारे बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना मिळाली. घटनेची माहिती मिळताच बिटरगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी अपघातग्रस्त युवकाला तातडीने उपचारासाठी ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.डॉक्टरांनी तपासून माधव बडेवार याला 'मृत' घोषित केले व बिटरगाव परिसरामध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे या घटनेची माहिती तातडीने मृताच्या नातेवाईकांना देण्यात आली. पुढील तपास बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार रोशन सरनाईक, रवी गीते, मोहन चाटे, जाधव, हे करत आहेत.

# अडेगाव येथील ईशान मिनरल्स कंपनीविरोधात ग्रामस्थांचे उपोषण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १५ फेब्रुवारी**

अडेगाव परिसरातील ईशान मिनरल्स कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, बेकायदेशीर उत्खणनामुळे निसर्गाचा ऱ्हास होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी मंगळवारी दिनांक 10 फेब्रुवारीपासून उपोषणाला सुरुवात केली आहे. गुरुवारी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी कॉंग्रेसचे प्रदेश सचिव संजय खाडे यांनी सहकाऱ्यांसह उपोषण मंडपाला भेट देत आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.



ईशान मिनरल्स कंपनी गेल्या काही वर्षांपासून अडेगाव परिसरात कार्यरत आहे. कंपनीतून निघणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात असली तरी नवनाथ महादेव क्षीरसागर यांना गेल्या 11 ते 12 वर्षांपासून कोणतीही भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे दरवर्षी 60 हजार रुपये नुकसान भरपाई तसेच आधीच्या नुकसानीसाठी 3 लाख 30 हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी बफर झोनमधील उत्खणन त्वरित थांबवून उत्खणन केलेल्या परिसराचे पुनर्भरण करण्याची मागणी केली आहे. डी-वॉटरिंगमुळे परिसरात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने 80 फुटाखालील डी-वॉटरिंग थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. कंपनीतून मोठ्या प्रमाणात धुळ निघत असल्याने रस्त्यावर नियमितपणे वॉटर टँकरद्वारे पाणी मारावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आंदोलनाला संजय खाडे यांच्यासोबत तेजराज बोढे, मोहन पानघाटे, नितेश ठाकरे यांच्यासह कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. संजय खाडे यांनी आंदोलनाला पाठिंबा देताना इशारा दिला की, "अडेगावच्या ग्रामस्थांचा लढा हा अन्यायाविरुद्धचा आवाज आहे. ईशान मिनरल्स कंपनीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना प्रशासनाने यात तातडीने हस्तक्षेप करावा. ग्रामस्थांच्या मागण्या मान्य कराव्यात. कॉंग्रेस पक्ष या आंदोलनाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. शेतकऱ्यांचे नुकसान थांबवले नाही तर कॉंग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून ग्रामस्थांसोबत लढा देईल." असा इशाराही संजय खाडे यांनी दिला आहे.

# बार्लिंगेश्वर देवस्थान येथे भक्तांना फळांचे वाटप

## माजी जि. प. सदस्य महादेवराव सुपारे यांची भेट

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि.१५ फेब्रुवारी**

तालुक्यातील डेहनी ते धानोरा तांडा रोडवरील अतिदुर्गम भागात पुरातन काळापासून प्रसिद्ध असलेल्या बार्लिंगेश्वर देवस्थान येथे महाशिवरात्री निमित्त दरवर्षी हजारो भावी भक्त दर्शनाचा लाभ घेत असतात. दरवर्षी प्रमाणे नित्यनेमाने दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी (फराळ ), फळे वाटप करण्यात येते. मागील अनेक वर्षेपासून दरवर्षी दर्शनासाठी हजेरी लावनाऱ्यांची संख्या शेकडो वरून हजारांच्या जवळपास पोहचत आहे.आज 16 फेब्रुवारी रोजी



माजी जि. प. सदस्य महादेवराव सुपारे यांनी दर्शन घेऊन भाविक भक्तांना फळांचे वाटप केले. नवसाला पावणारे महादेव संस्थान म्हणून परिचित आहे. अशातच आपले अनुभवावरून तत्कालीन आमदार स्वर्गीय प्रतापसिंग आडे यांचे सह अनेकांचे श्रद्धास्थान बनले. दिवसेंदिवस अतिदुर्गम (जंगलव्याप्त) भागातील बार्लिंगेश्वर देवस्थान येथे भाविक भक्तांची अलोट गर्दी दिसून येत आहे.

# आर्णीत शिवभक्तांना फराळ वितरीत

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १५ फेब्रुवारी**

महाशिवरात्री व संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त आर्णी येथे पाटील दूध डेअरी व समस्त दूध उत्पादक शेतकरी यांच्या वतीने फराळ (महाप्रसाद) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस हार अर्पण व पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भक्तांना फराळ (महाप्रसाद) वाटप करण्यात आले. गेल्या सलग पाच वर्षांपासून पाटील दूध डेअरीचे संचालक अतुल पाटील वाकोडे हे जयंती व महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करत असून ते नेहमीच सामाजिक



कार्यात सक्रिय असतात. सर्व धर्मसमभाव ही त्यांची विशेष ओळख मानली जाते. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून अनिल आडे, राजुदास जाधव, प्रिया तोडसाम, राजेश श्रीवास,प्रवीण देशमुख, संजय जाधव पाटील, सचिन ठाकरे, निखिल ब्राह्मणकर, मामा ठाकरे, बबलू देशमुख, परवेज बेग, प्रेम राठोडवआदीमान्यवरउपस्थितहोते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दूध उत्पादक शेतकरी व स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

### मुख्यमंत्र्यांकडून जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

यवतमाळ : पुढच्या आर्थिक वर्षासाठीच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारूप आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेवून आढावा घेतला. या बैठकीला सह्याद्री अतिथीगृह येथे पालकमंत्री ना. संजय राठोड व जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, प्रकल्प संचालक अमित रंजन, जिल्हा नियोतजन अधिकारी सुधाकर आडे व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

**Old Name - Mehboob Khan**

**New Name - Maheboob Khan Pathan**

I will hereafter use my New Name as Maheboob Khan Pathan in all my transactions and deeds

Address. Mubarak Nagar, Arni Dist Yavatmal -445103

# तेली प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत रिंगस क्रिकेट क्लब हे ठरली प्रथम विजेता

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पुसद, दि. १४ फेब्रुवारी**

"येथील मुस्लिम तेली समाजाच्या वतीने काकडदाती येथील डीजे टर्फवर क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित क्रिकेट सामन्याच्या प्रथम विजेत्याला ७७७७ रुपयांचं बक्षीस हनिफ निरबान यांचे वतीने देण्यात आले तर दुसऱ्या क्रमांकाचे ५५५५ रुपयांचे बक्षीस फिरोज तगाले यांच्या वतीने देण्यात आले. विजेत्यांची ट्रॉफी हाजी अजीस चव्हाण , तर दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी निजाम जी गौरी यांच्या वतीने तर प्रत्येक मैचेस मध्ये मॅन-ऑफ-द-मैच ची ट्रॉफी रहेमान असलम चव्हाण यांच्या तर्फे देण्यात आली तर मॅन-ऑफ-द-सिरीज चे चार ही ट्रॉफी मुबारक निरबाण यांच्या वतीने देण्यात आली या तीन दिवसीय क्रिकेट सामन्यात ८ टीमचे सामने रंगले होते या मध्ये चुरशी ची लढत करून रिंगस क्रिकेट क्लब व निरबाण क्रिकेट क्लब हे दोन्ही टीम अंतिम सामन्यात पोहचले होते. त्यांच्या मध्ये चांगलीच लढत होऊन रिंगस क्रिकेट क्लब हे विजयी झाली तर निरबाण क्रिकेट क्लब दुसऱ्या क्रमांकाची विजेता ठरली. तर रिंगस टीम चे खेळाळू अनिस निरबाण यांना मॅन-ऑफ-द-मैच व बेस्ट प्लियर ऑफ द मैच यांना देण्यात आले व मॅन-ऑफ-द-बेस्ट फिल्डर शाहरुख निरबाण, मॅन-ऑफ-द-बेस्ट बॉलर मोहसिन निरबाण यांना देण्यात आला होता. रेफरी म्हणून ताज जिंदरान, फहिम मेमन यांनी कार्य केले. सूत्र संचालन लतीफ गौरी यांनी केले.

या प्रसंगी हनिफ निरबाण , फिरोज तगाले , हाजी हनिफ चव्हाण, मुबारक निरबाण, हाजी अजीस चव्हाण , युनूस निरबाण ,अनिस चव्हाण, मतीन चव्हाण, जुबेर चव्हाण, सलीम निरबाण, वसीम निरबाण, सरफराज निरबाण , व अन्य मान्यवरांच्या हस्ते खेळाडूना ट्रॉफी देण्यात आली. आयोजन अजहर निरबाण सर, जम्मा गौरी , विक्की गौरी, शकील गौरी, अब्दुल रहेमान चव्हाण, फारूक चव्हाण, लतीफ गौरी, रशीद मामा चव्हाण, सोहेल निरबाण , युसुफ निरबाण, रहेमान गौरी ,इद्रिस रजा, वसीम चव्हाण, सोनू तगाले, अनस चव्हाण , सलमान निरबाण , लकी निरबाण व अन्य क्रिकेटप्रेमी यांनी अथक परिश्रम घेतले.




# कार्यालय नगर परिषद, वणी जिल्हा यवतमाळ

## वार्षिक ई-निविदा सुचना सन 2026-27

मुख्याधिकारी, नगर परिषद वणी जि. यवतमाळ यांचे वतीने **सर्वसाधारण निधी** अंतर्गत सन 2026-27 या आर्थिक वर्षाकरिता विविध कामाच्या वार्षिक ऑन-निविदा ब-१ पद्धतीने योग्य त्या पंजीबद्ध संबंधित कामाच्या अनुभवी कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. विविध कामाची कामाची ई-निविदा केवळ ऑन-लाईन पद्धतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमूना नगर परिषद कार्यालय पाणी पुरवठा विभागात दि. 16-02-2026 पासून पाहावयास उपलब्ध आहे. निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करण्याकरिता दि. 16-02-2026 ते 25-02-2026 दुपारी 5:00 वाजेपर्यंत निविदा सादर करता येईल. विविध वार्षिक निविदाचे तपशील कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शविण्यात आले आहे.

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| --- | --- | --- |
| (सौ. विद्या आत्राम) | (श्री. राकेश बुग्गेवार) | (डॉ. सचिन गाडे) |
| अध्यक्षा | उपाध्यक्ष तथा सभापती (पाणी पुरवठा) नगर परिषद वणी | मुख्याधिकारी |
| नगर परिषद वणी | | नगर परिषद वणी |

४

युवाराष्ट्र दर्शन

# गोंदिया जिल्हा

दि. १६ फेब्रुवारी २०२६

## स्टेट लेवल टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन कॉम्पिटिशनचे आयोजन

**देवरी :** स्थानिक देवरी येथील छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने स्टेट लेवल टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन कॉम्पिटिशनचे भव्य व यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत नागपूर विभागातील डिप्लोमा इन फार्मसीच्या एकूण ३३ महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

यावेळी डॉ. कांचन मानकर, वैशाली राजे, अनिलकुमार येरणे, जयश्री येरणे उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षण डॉ.निखिल अमनेरकर, डॉ.मंगेश कुमारे, डॉ. योगेश आमगावंकर आणि गौरव परभत यांनी केले. कार्यक्रमाला डॉ.महेंद्र शिराडकर, डॉ. उपदेश लाडे आणि योगेश तिरगाम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण व संशोधनात्मक विषयांवर आपले टेक्निकल पेपर प्रेजेंटेशन करून परीक्षक व उपस्थितांची प्रशंसा मिळवली. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक १५,००० रोख कु. संभावी मिश्रा व कु. दिपाली वंजारी, द रॉयल गोंडवाना कॉलेज ऑफ फार्मसी, नागपूर यांनी मिळवले. तसेच द्वितीय पारितोषिक १०,००० रोख विवेक खोंड व कु. शब्बो अन्सारी, व्ही.वाय.डब्ल्यू.एस. इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी, बोरगाव, वर्धा यांनी मिळवले तसेच तृतीय पारितोषिक ५,००० रोख कु. रुची भट व मितेश गौतम, महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, खमारी यांनी मिळवून यश संपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दीक्षा लांजेवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कु. किरण कापगते यांनी मानले. एकंदरीत या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# प्लास्टिक बंदी मोहिमेचा धसका !

## व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई नगरपंचायतच्या मोहिमेला दुकानदाराचे समर्थन

**अर्जुनी मोरगाव :** शासनाने १ जुलै २०२२ पासून सिंगल युज प्लास्टिक वर देशव्यापी बंदी घातली.तरीही शहरात मोठ्या प्रमाणावर बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर जोमात सुरू असल्याने मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाने यांच्या मार्गदर्शनात नगरपंचायत ने प्लास्टिक बंदी विरोधात धडक मोहीम हाती घेतली.शहरातील फुटपाथ विक्रेत्यांपासून तर मोठ्या व्यापारपर्यंत सर्वांची चौकशी सुरू केली. दरम्यान अनेक व्यापाऱ्यांकडे बंदी असलेली प्लास्टिक आढळून आली. या व्यापाऱ्यांवर प्लास्टिक बंदी कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. दंडात्मक कारवाई मध्ये मागील दीड महिन्यात पाच हजार ९०० रुपयांची वसुली करण्यात आली.



नगरपंचायतच्या या धडक कारवाईमुळे अनेक व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले असून काही व्यापाऱ्यांनी प्लास्टिक मागू नका अशी जागृती करणारे फलक व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये लावले आहेत. व्यापाऱ्यांच्या या कृतीचे सर्वत्र स्वागत होत आहे.अभियानाच्या यशस्वीतेत स्वच्छता प्रमुख वृषभ पांडे, निखिल बंड,दिलीप उईके,एकनाथ चव्हाण, सुमित मेश्राम,शुभम गौरकर, अश्विनी शहारे, मनीषा मेश्राम,सुरेश बोरीकर,दुर्योधन नेवारे यांचा समावेश आहे. यावेळी प्लास्टिक ही विघटन न होणारी पर्यावरणाला धोकादायक वस्तू आहे. प्लास्टिक मुळे पर्यावरणासोबत मनुष्याचे जीवनही धोक्यात आले आहे. प्लास्टिक वस्तू जाळल्यामुळे घातक विषारी वायू तयार होऊन तो श्वसनाद्वारे मानवी शरीरात प्रवेश करतो. यामुळे मोठे मोठे आजार होतात.प्लास्टिक वस्तूंना पर्याय म्हणून कागदी आणि कापडी पिशव्यांचा वापर करावा.सरकारच्या या प्लास्टिक बंदी अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगरपंचायत मुख्याधिकारी ज्ञानेश सोनवाणे यांनी केले आहे.'

### या वस्तूंवर आहे बंदी

कमी मायक्रोनच्या पिशव्या, प्लास्टिकचे चमचे, प्लेट्स, थर्माकोल आणि प्लास्टिकच्या काड्या यासारख्या वस्तूंची निर्मिती,साठवणूक, विक्री आणि वापरावर कठोर निर्बंध घातले.या नियमांचे उल्लंघन केल्यास ५ हजार ते २० हजार रुपयेपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली.

## निवड होताच सभापतींचा कक्षांसाठी 'होऊ दे खर्च'

**गोंदिया :** नगर परिषदेतील-नवनिर्वाचितांचा कार्यकाळ सुरू झाला आहे. सभापतींची निवड होताच अधिकारी कर्मचाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. अध्यक्ष व सभापतींच्या कक्षांसाठी आता अधिकारी कर्मचाऱ्यांना जागा सोडण्याची वेळ आली आहे. कित्येक विभागांचे कामकाज दुसरीकडे हलविण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनाही स्वतःसाठी बसण्यासाठी जागा शोधावी लागत आहे, तर सभापतींची निवड झाल्यावर कक्षाच्या नूतनीकरणावर होऊ दे खर्च असे चित्र नगर परिषदेत आहे.

नगराध्यक्षांची थेट जनतेतून निवड झाल्यानंतर लगेच उपाध्यक्ष व सभापतींची निवड करण्यात आली. अध्यक्ष व सभापतींकडून कक्षासाठी आपल्या मर्जीने जागेचा शोध सुरू झाला. यात नगराध्यक्षांनी बाजार व पाणीपुरवठा विभागाची खोली घेतली. यामुळे दोन्ही विभागांना इतरत्र हलविण्यात आले आहे. शिक्षण सभापतींनी त्यांच्यासाठी आवक जावकच्या बाजूची रूम आवडल्याने तेथे होणारे कामकाज आवक जावकमध्ये हलविण्यात आले आहे.




वीज पाणीपुरवठा सभापतींनी विभागाची रूम पसंत केल्याने वीज विभागाचे कामकाज अन्यत्र हलविण्यात आले आहे. महिला बालकल्याण सभापतींसाठी स्वच्छता विभागाचे अभियंता बसत असलेली खोली रिकामी करविण्यात आली असून, तेथेही सभापतींच्या चेंबरसाठी सौंदर्याकरणाचे काम सुरू आहे.

### अधिकारी शोधत आहेत बसण्यासाठी जागा

मागील कार्यकाळात महिला व बालकल्याण समिती सभापतींसाठी असलेली रूम कार्यकाळ संपल्यानंतर स्वच्छता विभागाचे अभियंता उईके यांना देण्यात आली होती. मात्र, आता महिला बालकल्याण सभापतींना परत तीच रूम चेंबरसाठी दिली जात आहे. यामुळे उईके यांना तेथून निघावे लागले असून, आता त्यांना बसण्यासाठी जागाच नाही. असाच प्रकार वीज विभागातील अभियंत्यांसोबत घडला. पाणीपुरवठा सभापतीच्या चेंबरसाठी वीज अभियंता नंदनवार यांना रूम सोडावी लागली व त्यांना वऱ्हांड्यांत टेबल लावून बसण्याची वेळ आल्याचेही ऐकिवात आहे. त्याचप्रकारे, पाणीपुरवठा विभागातील अभियंता गौरखेडे यांना नगराध्यक्षांच्या चेंबरसाठी निघावे लागले आहे.

## जीवे मारण्याची धमकी

**गोंदिया :** डुग्गीपार पोलिस ठाण्यांतर्गत सडक अर्जुनी येथील शेंडा मार्गावर आरोपीने फिर्यादी महिलेला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना ११ फेब्रुवारीची आहे.

महिला फिर्यादी ही ब्युटी पार्लर चालवित असतांना आरोपी शमशाद शेख, शहजाद शेख दोन्ही रा. सडक अर्जुनी यांनी जमिनीवरून वाद निर्माण केला. तसेच शिवीगाळ करून फिर्यादी महिलेला जीवे मारण्याची धमकी दिली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## सटवा/डव्वा येथे आमदारांच्या हस्ते पशुपक्षी प्रदर्शनीचे उद्घाटन

गोरेगाव : तालुक्यातील साटवा/डव्वा पशुपक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते पशुपक्षी प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषदच्या सभापती दिपाताई चंद्रिकापुरे, डॉ. लक्ष्मण भगत, रजनीताई कुंभरे, पौर्णिमाताई ढेंगे, पंचायत समिती गोरेगावच्या सभापती चित्रकलाताई चौधरी, उपसभापती रामेश्वर महारवाडे, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद गोंदिया पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद सदस्य प्रीतिताई कतलाम, जितेंद्र कटरे, मा. सदस्य मनोज बोपचे, राजकुमार यादव, किशोरकुमार पारधी, ओमप्रकाश कटरे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय गोंदिया डॉ. जे. के. तीटमे, तसेच महेंद्र ठाकूर, ओमेंद्र ठाकूर, टीकाराम रहांगडाले, रवींद्र कटरे, अर्चना ठाकूर, विनोद पारधी, पुष्पराज जलबंधू, कविता कापगते, गट विकास अधिकारी पंचायत समिती गोरेगाव एच. व्ही. गौतम यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी पशुपालक व शेतकरी बांधवांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. पशुसंवर्धन विभागांतर्गत राष्ट्रीय पशुधन अभियान, पशुधन विकास योजना, दुग्धव्यवसाय प्रोत्साहन योजना, लसीकरण मोहीम, जनावरांचे विमा संरक्षण योजना तसेच शासकीय अनुदानाच्या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञ अधिकाऱ्यांनी आधुनिक पशुपालन तंत्रज्ञान, दुग्धउत्पादन वाढविण्याचे उपाय, चारा व्यवस्थापन, गोठा व्यवस्थापन व आजार प्रतिबंध यावर माहिती दिली. प्रदर्शनात विविध जातींचे पशुपक्षी सादर करण्यात आले होते. उत्कृष्ट पशुपालन करणाऱ्या पशुपालकांना विविध बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पशुपालन हा महत्त्वाचा पूरक व्यवसाय असून, शासनाच्या योजनांचा लाभ घेतल्यास शेतकरी व युवकांना स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनाबद्दल सर्वांचे कौतुक करण्यात आले.

## फाटक बंद, जनता बंदिस्त; उड्डाणपुल कधी बांधणार?



**आमगाव :** गोंदिया-आमगाव-देवरी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४३ वरील किडंगीपार आणि बाम्हणी येथील रेल्वे फाटकांमुळे स्थानिक नागरिक, प्रवासी आणि रुग्णांना गंभीर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. दक्षिण-पूर्व रेल्वेच्या मुंबई-हावडा मुख्य मार्गावरील तीन रेल्वे लाइनवर सतत गाड्यांची ये-जा सुरु असल्याने फाटक वारंवार आणि दीर्घकाळ बंद राहते. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर १ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. यासाठी फ्लायओव्हरचा निर्णय लवकर घेण्याची मागणी होत आहे.

रेल्वेच्या 'ऑटो सेक्शन' व्यवस्थेमुळे साधारण दर तीन किलोमीटरवरून रेल्वेगाडी जाते. तीन लाइनवर अखंड रेल्वे वाहतूक असल्याने फाटक बंद होताच १५ ते २० मिनिटांत ५-६ गाड्या निघून जातात. या काळात रस्त्यावर वाहनांची मोठी गर्दी होते आणि रुग्णवाहिकेसह आपत्कालीन सेवादेखील अडथळयात सापडतात. ९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३:४५ ते ४:०५ या वेळेत किडंगीपार फाटकावर भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली.दोन्ही बाजुला एक ते दीड किमीपर्यंत वाहने अडकली होती. यादरम्यान गंभीर रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकाही यात अडकल्या. फाटक बंद असल्याने तातडीचा कोणताही उपाय करता आला नाही.

## आधुनिक पद्धती रुजवून दुग्ध उत्पादन वाढवावे : भांडारकर




**देवरी :** पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, जिल्हा परिषद गोंदिया तसेच पंचायत समिती देवरी यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील गणुटोला/ककोडी येथे तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रदर्शनात विविध जातींच्या दुधाळ जनावरांचे, पशुपक्ष्यांचे प्रदर्शन, दुग्ध व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान, चारा व्यवस्थापन, पशुवैद्यकीय सेवा आणि शेतकरी-गोपालकांसाठी उपयुक्त मार्गदर्शन सत्रे यांचा समावेश होता.अशा कार्यक्रमांमुळे पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक पद्धती रुजाव्यात आणि दुग्ध उत्पादन वाढावे, यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असल्याचे विचार जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी व्यक्त केले.

यावेळी या कार्यक्रमाला जि.प. सभापती दिपा चंद्रिकापुरे, पं.स. सभापती अनिल बिसेन, जि.प.सदस्य राधिका धरमगुळे, कल्पना वालोदे, उषाताई शहारे, पं.स. अंबिका बंजार, प्रल्हाद सलामे, श्यामकला गावळ, भारती सलामे, वैशाली पंधरे, शैलजा सोनवाने, रंजीत कासम, उपसरपंच अशोक नरेटी, बलदेव कुंभरे, रसिका मडावी, हेरडकरजी ठाणेदार, कुसबा मडावी, चैनसिंगजी, कांतीलाल पटले, डॉ. संजिवनी वाघमारे, डॉ. देवेंद्र कटरे इतर मान्यवर आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि गोपालक उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, पंचायत समिती देवरीचे सदस्य, स्थानिक गोपालक यांनी सहकार्य केले.

## कोंडा नाही, टाळूवरची बुरशी; दुर्लक्ष कराल तर थेट टक्कल

### टिनिया कॅपिटिसची लक्षणेः डोक्यावरच्या केसांची काळजी कशी घ्यावी?

**गोंदिया :** टाळूवर होणारा बुरशीजन्य संसर्ग म्हणजे टिनिया कॅपिटिस. या आजाराने अनेकांच्या डोक्यावरील केस जातात. मात्र, अनेकांना हे डॅंडरपमुळेच होत असल्याचा भास होतो. मुळात हा प्रकार बुरशीमुळे वाढतो. यात उंदरी लागणे अथवा टाळूवरचे केस जाणे हा प्रकार घडतो. यातून अवेळी टक्कल पडण्याचा प्रकार घडतो. ३ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये हा प्रकार प्रामुख्याने पाहायला मिळतो.

डर्माटोफाइट नावाच्या बुरशीपासून हा फंगस पसरण्यास सुरुवात होते. या प्रकारात डोक्याला तीव्र स्वरूपाची खाज सुटते आणि केस गळण्यासाठी सुरुवात होते. हा प्रकार अत्यंत धोकादायक स्वरूपाचा आहे. यात अचानक चट्टा पडतो, कधी कधी काळे डागही दिसतात. यानंतर केस गळण्यास सुरुवात होते. कधी कधी एकदम केस गळून जातात. केस गळण्यासाठी विविध बाबी कारणीभूत ठरतात. मात्र, टाळूवरची बुरशी असेल तर चट्टा दिसतो आणि त्यानंतर केस गळण्यास सुरुवात होते. तीव्र स्वरूपाची ही केस गळती काही दिवसांतच टक्कल निर्माण करते. अशावेळी प्रत्येकाने आपल्या डोक्यावरील केसांची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळ न दवडता योग्य तो सल्ला डॉक्टरांकडून घेणे गरजेचे ठरणार आहे.

## बळीराजाला योग्य सल्ला मिळणार; किसान कॉल सेंटरमुळे शेती फुलणार!

गोंदिया : शेतीमध्ये येणाऱ्या नवनवीन समस्या, हवामानातील बदल आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकरी नेहमीच संभ्रमात असतो. हीच अडचण ओळखून केंद्र शासनाने 'किसान कॉल सेंटर' ही क्रांतिकारी योजना सुरू केली आहे. आता एका फोन कॉलवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन थेट बांधापर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता पिकांबाबत आवश्यक ती माहिती मिळणे सोयीचे झाले आहे.शेतकऱ्यांच्या सेवेसाठी हे कॉल सेंटर आठवड्याचे सातही दिवस कार्यरत असते. सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत शेतकरी थेट तज्ज्ञांशी संवाद साधू शकतात. विशेष म्हणजे, कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त इतर वेळी आलेल्या कॉल्सचे रेकॉर्डिंग केले जाते आणि नंतर शेतकऱ्यांना संपर्क करून उत्तरे दिली जातात.या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शेतीविषयक शंकांचे आणि समस्यांचे त्यांच्याच स्थानिक भाषेत तत्काळ निराकरण करणे, हा आहे. कृषितज्ज्ञांकडून शास्त्रोक्त सल्ला देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना स्वावलंबी बनवणे हे यामागचे मुख्य सूत्र आहे.

## मसाला, तेल, तूरडाळीचा भडका; दरवाढीने बजेट कोलमडले!

**गोंदिया :** घरगुती गरजा पूर्ण करण्यासाठी रोजच्या वापरातील मसाले, खाद्यतेल आणि विविध प्रकारच्या डाळींच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. स्वयंपाकघरातील अत्यावश्यक दैनंदिन वापराच्या वस्तू महाग होत असल्यामुळे सर्वसामान्य कुटुंबाला आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

येणाऱ्या काळात होळी, गुढीपाडवा, रमजान ईद असे सण आहेत. सणासुदीला खास पदार्थ बनविले जातात. तसेच लग्नसराई तोंडावर आहे. या काळात हे पदार्थ महाग असो वा स्वस्त ते खरेदी करण्याकडे लोकांचा कल असतो.

सुकामेवा, डाळ, साखर या अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीत तेजी येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबाचे बजेट पुन्हा एकदा कोलमडण्याची शक्यता आहे.व्यापाऱ्यांच्या मते, उत्पादन खर्चात वाढ, वाहतूक खर्च, हवामानातील बदल आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतार याचा परिणाम थेट दरांवर होत आहे. जीवनाश्यक वस्तू सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## डव्वा जिल्हा परिषद क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करा

### जि.प.सदस्य पटले यांची मागणी जिल्हाधिकारी नायर यांना निवेदन

**गोंदिया :** डव्वा जिल्हा परिषद क्षेत्रातील जवळपास ४२० शेतकऱ्यांचे तांत्रिक अडचणीमुळे ईपीक होऊ शकली नाही, यामुळे धान विक्रीकरिता अडचण निर्माण होत आहे, तेव्हा तांत्रिक अडचण दूर करून ई-पीक करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, तसेच गोंदिया ते कोहमारा मार्गाचे चौपदीकरण करण्यात यावे, यासह आदी मागण्यांचे निवेदन जि.प.सदस्य डॉ. डॉ.भुमेश्वर पटले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



डव्वा जिल्हा परिषद क्षेत्रा अंतर्गत अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. त्यातच यंदाच्या खरीप हंगामातील धान पिकाच्या ई-पीक नोंदणीपासून परिसरातील जवळपास ४२० शेतकरी वंचित आहेत, तेव्हा तांत्रिक अडचण दुर करुन ईपीक करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात यावे, तसेच गोंदिया ते कोहमारा हा मार्ग राज्य मार्गातून राष्ट्रीय महामार्गात परिवर्तीत करण्यात आले असून दिवसेंदिवस या महामार्गावर वाहनांची वर्दळ वाढत चालल्याने अरुंद रस्त्यामुळे अपघातांची संख्याही वाढत आहे. सदर मार्गावरील गावभागातील रस्त्याचे त्वरीत चौपदीकरण व रुंदीकरण करण्यात यावे, डव्वा जि.प. क्षेत्र हा नागझिरा नवेगाव व्याघ्र प्रकल्पात येत असल्याने वन्य प्राण्यांचाही हैदोस वाढला आहे. तसेच वन्य प्राणी शेत पिकांचे नुकसान करित आहे, तसेच गावकऱ्यांना अनेकदा बिबट, वाघ यासारख्या हिंसक वन्य प्राण्यांचे दर्शन होत असल्याने गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तेव्हा या प्राण्यांचा वन विभागाकडून बंदोबस्त करण्यात यावा, वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे हानी झालेल्या कुटुंबाना आर्थिक मदत करण्यात यावे,यासोबतच पर्यटन वाढीच्या दृष्टीने नागझिरा अभयारण्यात प्रवेश करण्याकरीता मुरदोली येथील बंद करण्यात आलेले जुने प्रवेशद्वार सुरु करुन या परिसरातील पर्यटन व्यवसायाला चालना देण्याची मागणी निवेदनात जि.प.सदस्य डॉ.भुमेश्वर पटले यांनी केली आहे.या संदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

## नांदी फाउंडेशनचा रोजगार योग्यता विकास कार्यक्रम




**सडक अर्जुनी :** स्थानिक मनोहरभाई पटेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सडक अर्जुनी आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिंद्रा प्राइड क्लासरूम' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी रोजगार योग्यता विकास कार्यक्रमाचे नुकतेच उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चेतनकुमार बी. मसराम होते.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम नांदी फाउंडेशन चे कुशल प्रशिक्षक श्री. अक्षय मेश्राम यांच्या मार्गदर्शनात दिनांक १० ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राबविण्यात येत आहे. १२० तासांच्या ह्या विशेष कार्यक्रमाचा उद्देश्य विद्यार्थ्यांना रोजगार विश्वात पदार्पण सुलभ करण्यासाठी त्यांच्यात संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, देहबोली, वेळ व्यवस्थापन, मुलाखत तंत्र इत्यादी कौशल्यांचा विकास करणे हा आहे. कार्यक्रमाचे संचालन महिला कक्ष प्रमुख प्रा. स्मिता लांजेवार यांनी केले तर आभार कु. चांदणी उरकुडे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
भंडारा जिल्हा
दि.१६ फेब्रुवारी २०२६

## स्वस्त धान्य दुकानदाराकडुन लाभार्थ्यांच्या राशनवर डल्ला

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**तुमसर** : तुमसर शहरासह जिल्ह्यातील बहुतांश सर्वच स्वस्त धान्य दुकानांतून ग्राहकांना कमी धान्य दिल्या जाते. हे धान्य काळ्या बाजारात विकले जाते. याबाबत ग्राहकांना माहिती असूनही ते रेशन दुकानदारांच्या भीतीपोटी तक्रार करण्यास धजावत नाही. अन् पुरवठा विभाग तक्रार आल्याशिवाय कारवाई करू शकत नसल्याचे चित्र आहे. यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांना काळ्या बाजारात धान्य विकण्यास मोकळे रानच मिळाले आहे. याप्रकरणी स्वराज्य युवा एकता फाउंडेशनच्या माध्यमातून राशन लाभार्थ्यांसह तहसीलदार उपेश अंबादे यांना निवेदन दिले आहे. यावेळी स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष अमित मेश्राम, माजी सरपंच अविनाश उपरिकर, अमोल मंदूरकर, शैलेश गोमासे, गौरी उद्धव शेंदरे, गीता नेवारे, महेंद्र शेंदरे, मनीष नेवारे, प्रमिला नगरे, गंगा इंगळे सह राशन लाभार्थी उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# मुख्य आरोपी डॉ.बाजपेयी यांचा आत्महत्येचा प्रयत्न

- ब्लेडने शरीरावर घातले घाव
- बाळ विक्री प्रकरण

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**भंडारा** : भंडारा गोंदिया जिल्ह्यात गाजत असलेल्या बाळ विक्री प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. नितेश बाजपेयी याचा पोलिसांकडून शोध सुरू असतानाच, त्याने स्वतःवर ब्लेडने वार करून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळ जनक घटना घडली आहे. सध्या आरोपी असलेला डॉक्टर भंडारा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.



स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून नवजात बालिकेवर नागपूर येथे उपचार करण्यासाठी नेत असल्याच्या नावाखाली अडीच लाखात मुलीची विक्री करण्याचे प्रकरण ३ फेब्रुवारी रोजी उघडकीस आले. या प्रकरणात मुख्य आरोपी असलेला गोंदिया येथील न्यू बालाजी हॉस्पिटलचे संचालक डॉ. नितेश बाजपेयी यांच्यासह सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. यातील दोघांना आतापर्यंत पोलिसांनी अटक केली होती तर मुख्य सूत्रधार असलेल्या डॉ. बाजपेयी याचा शोध सुरू होता. १७ फेब्रुवारी रोजी त्याच्या अटकपूर्व जामीनावर भंडारा जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी होणार होते. फटके पासून बचावासाठी धडपडत असलेल्या डॉक्टरांचे एकेक प्रकरण पुढे येत असल्याने त्याचे पाय खोलात जात होते. दरम्यान १४ रोजी कटंगी येथून भंडारा कडे स्वतःच्या वाहनाने येत असताना डॉ. नितेश बाजपेयी याने स्वतःच्या पोटावर आणि शरीरावर ब्लेडने वार करून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. जखमी झालेल्या डॉक्टरला आधी तुमसर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. सध्या त्याच्यावर भंडारा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपीची तब्येत स्थिर असल्याचे कळते. घटनेतील मुख्य आरोपी असलेल्या बाजपेयी याने केलेला हा प्रकार खळबळ माजवीणारा असून आता पोलिसांचे हात लवकरच त्याच्या मुसक्या आवळतील हे स्पष्ट आहे.

# कंपनीने पगारवाढ न दिल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी कापले मोबाईलचे केबल

◆ तब्बल ५४ टॉवरवरील नेटवर्क सेवा खंडित ◆ २५८ तास नेटवर्क खंडीत

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**भंडारा** : रिलायन्स जिओ कंपनीकडे पगारवाढीची मागणी केली. संपही केला. परंतु, कंपनीने मागणीकडे दुर्लक्ष केल्याने संतापलेल्या दोन कर्मचाऱ्यांनी जियो कंपनीच्या मोबाइल टॉवरवरील केबलच कापली. त्यामुळे तब्बल २५८ तास नेटवर्क खंडीत राहिले. याचा फटका जिल्ह्यातील लाखो ग्राहकांना बसला त्यातून कंपनीचे तीन लाख रुपयांचे नुकसान ही झाले आहे. या प्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



मनोज राजेंद्र पाटील आणि राकेश धांडे अशी या दोन कर्मचाऱ्यांची नावे आहेत. राजेंद्र आणि राकेश हे दोघे जिओ कंपनीत तंत्रज्ञ म्हणून कामाला आहेत. काही दिवसांपासून त्यांनी कंपनीकडे पगारवाढीची मागणी केली. मागणी पूर्ण न झाल्याने दोन्ही कर्मचारी संपावर गेले होते. तरीही कंपनीकडून कोणतीही हालचाल होत नसल्याने त्यांनी कंपनीच्या नेटवर्कच्या कामात हस्तक्षेप निर्माण केला. ९ फेब्रुवारी रोजी दोन्ही कर्मचाऱ्यांनी रिलायंस जिओ कंपनी मोबाइल टॉवरवरील फायबर केबल कापली. त्यामुळे ५४ टॉवरवरील नेटवर्क सेवा २५८ तासांसाठी खंडीत झाली. शिवाय त्यात कंपनीचे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

सोबतच जिओ कंपनीच्या मोबाइलधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. याप्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अचानक मोबाईलचे नेटवर्क गेल्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी खळबळ उडाली. नेटवर्क जाण्याचे नक्की कारण ही कोणाला समजत नव्हते. त्यामुळे मोबाईलधारकांमध्ये संभ्रमाचं वातावरण होतं. मात्र ही बाब लवकरच त्यांच्या ही लक्षात आली. या प्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## रमेश बारस्कर यांचे निधन

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**सानगडी** :- सासरा येथील रमेश रतीराम बारस्कर यांचे वयाच्या ५० व्या वर्षी दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोज शनिवारला सायंकाळी ५ वाजता अचानक दुःखद निधन झाले. यांचे अंत्यसंस्कार दिनांक १५ फेब्रुवारा २०२६ रोज रविवारला दुपारी १ वाजता सासरा येथील चुलबुल घाटावर करण्यात आले. त्याच्या पश्चात आई,भाऊ,पत्नी आणि दोन मुले असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# सीतासावंगी येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**नाकाडोंगरी**:- अनुकंपा रोजगार योजनेतील करण्यात आलेल्या बदलांना विरोध तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज सीतासावांगी येथील बाजार चौकात अनिश्चितकालीन भूख हडताल आंदोलनास सुरुवात करण्यात आली. पहिल्याच दिवशी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.




आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये मायलद्वारे अनुकंपा रोजगार योजनेत करण्यात आलेले बदल तात्काळ मागे घ्यावेत, सेवाकाळात मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात अनुकंपा नियुक्तीची पात्रता पूर्ववत करावी, मेडिकल अनफिट घोषित कर्मचाऱ्यांना व त्यांच्या आश्रितांना तातडीने अनुकंपा/ मेडिकल नियुक्तीचा लाभ द्यावा, तसेच सेवानिवृत्तीला ३ ते ५ वर्षे शिल्लक असलेल्या आणि मेडिकल अनफिट असूनही कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली भरती करावी, या मागण्यांचा समावेश आहे.

तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सेटलमेंट/अनुकंपा लाभ देताना लागू असलेली ६ लाख वार्षिक उत्पन्नाची अट रद्द करावी, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

उपोषणकर्ते इंजी. प्रकाशकुमार कमलेश धिकोडी, सरपंच सीतासावांगी तथा भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष भंडारा यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले असून, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनास कृष्णकांत बघेल (जिल्हा परिषद सदस्य), नरेंद्र गेडाम (पंचायत समिती सदस्य), नदीम पाशा (उपसरपंच सीतासावांगी), करूना कोकोडे (सरपंच चिखला), नेहा मेश्राम (सरपंच बालापूर), वृषभ मेश्राम (ग्राम पंचायत सदस्य), ईश्वर तिरपुडे, महेश मिश्रा व दुर्गा परतेती यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

पहिल्या दिवशी आंदोलन शांततेत पार पडले असून, प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

# पालोरा येथे समता सैनिक दलाची स्थापना

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**पालोरा** : पवनी तालुक्यातील पालोरा येथे अखिल भारतीय समता सैनिक दल स्थापन करण्यात आला. अन्यायाविरुद्ध लढा उभारण्याकरिता मोठ्या उत्साहाने अखिल भारतीय समता सैनिक दलाची स्थापना करण्यात आली. या दलामध्ये पुरुष आणि महिला मोठ्या संख्येने दलामध्ये प्रवेश केला.




याप्रसंगी अध्यक्षस्थानी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई, तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून पालोरा येथील सरपंच शिशुपाल रामटेके, समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष ,शिवराम जाधव, कार्याध्यक्ष अनिल वाघमारे,राष्ट्रीय उपाध्यक्ष वामन धारगावे,राष्ट्रीय जी. ओ.सी. मेजर नंदकिशोर मनवर,जिल्हा कमेटी अध्यक्ष भाष्कर मनवर,सचिव हिरामण मुल,कोषाध्यक्ष जयदेव आबुलकर,तालुका कमेटी अध्यक्ष हंसकला देवगडे, उपाध्यक्ष तिलोत्तमा मेश्राम, सचिव रत्नदीप मांडवकर, कोषाध्यक्ष सुकेशनी पाटील, शाखा प्रमुख अल्का देवगडे, कमांडो शितल मांडकर, माधुरी शंभरकर, सुजाता लिंगाईल, हेमलता वाघमारे, रिता मुंघाटे,विशाखा मेश्राम, शशिकला ढाकणे,शाखा प्रचारक - हंसकला देवगडे , स्थानिक यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडण्यात आला. पालोरा येथील कमिटी अध्यक्ष - रंजना मेश्राम, उपाध्यक्ष - रेखा धारगावे सचिव-प्रज्ञा रंगारी कोषाध्यक्ष - दिपक मेश्राम ,शाखाप्रमुख उज्वला गोंडाणे, सहसचिव वंदना रंगारी, कमांडो देवानंद रंगारी, संघटक मेघा मेश्राम, सहसंघटक पुण्यशिला धारगावे, सदस्या निरुपाला ठवरे, गिरजा मेश्राम सदस्या-भाग्यशाली गोंडाणे, जिल्हा कमांडर ईश्वर मेश्राम अशाप्रकारे पालोरा येथील समिती गठित करण्यात आली.

## राज्य महिला आयोगातर्फे १७ रोजी जनसुनावणी

**भंडारा** : श्रीमती रुपाली चाकणकर, अध्यक्षा राज्य महिला आयोग (राज्यमंत्री दर्जा) ह्या दिनांक १७/०२/२०२६ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असुन त्यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११:०० वाजता नियोजन भवन भंडारा येथे जनसुनावणी घेण्यात येणार आहे.या सुनावणीवेळी जिल्ह्यातील पिडीत महिला कोणतीही पुर्वसुचना न देता प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित राहुन आपली मालमत्ताविषयक/कौटुंबिक हिंसाचार व इतर प्रकरणातील समस्या लेखी स्वरुपात आयोगापुढे मांडु शकतील .

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर १७ रोजी जिल्ह्यात



**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**भंडारा** : अध्यक्ष राज्य महिला आयोग राज्यमंत्री दर्जा रुपाली चाकणकर हे मंगळवार दि. १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. १७ फेब्रुवारी,२०२६ रोजी सकाळी ११.०० ते २.०० जनसुनावणीसाठी उपस्थिती राहतील.स्थळ:- जिल्हा नियोजन भवन,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर सिव्हिल लाईन भंडारा.त्यानंतर दुपारी २.०० ते ३.०० वाजेपर्यत राखीव राहतील.यानंतर दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत आढावा बैठक घेतली.स्थळ :- जिल्हा नियोजन भवन,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर सिव्हिल लाईन भंडारा.त्यानंतर सायंकाळी ५.०० ते ५.२० वाजेपर्यत पत्रकार परिषद घेतील. स्थळ:-जिल्हा नियोजन भवन,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर सिव्हिल लाईन भंडारा. या सर्व बैठकीनंतर सायंकाळी ६.०० वाजता शासकीय विश्रामगृह भंडारा. येथून चंद्रपूरकडे प्रयाण करतील.

# बोर्डाच्या परीक्षेला सामोरे विद्यार्थ्यांनी तणावमुक्त राहावे ! मुख्याध्यापक रामटेके

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**भंडारा** : तालुक्यातील भागिरथा भास्कर हायस्कूल टवेपार येथे दिनांक १३ फेब्रु. २०२६ ला वर्ग ९वी कडुन वर्ग १०वी च्या विद्यार्थ्याकरिता निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री रामटेके सर तर प्रमुख अतिथी संस्थेचे सहसचिव श्रीकांत शंभरकर , शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मधुकर सेलोकर, भागिरथा भास्कर हायस्कूल भंडाराचे मुख्याध्यापक श्री.लुचे सर, कविता मते माजी सरपंच, जेष्ठ शिक्षक बांडेबुचे व जी.एच सेलोकर आदि होते . निरोप समारोप प्रसंगी मुख्याध्यापक श्री. रामटेके सरांनी बोर्डाच्या परीक्षेच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन केले . संस्थेचे सहसचिव श्रीकांत शंभरकर यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जातांना सकारात्मक विचार करावा.परीक्षेला अजुन वेळ आहे. चांगला अभ्यास करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे.लुचे सर यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की दोन सराव पेपर झालेले आहेत त्यामुळे घाबरण्याची काही गरज नाही सर्व मुले हमखास यश प्राप्त करतील.कविता मते यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या जेष्ठ शिक्षक बांडेबुचे सरांनी सांगितले की विद्यार्थ्यांनो वर्ग १०वी नंतर करियर च्या नवीन वाटा आहेत आतापासूनच आपला मार्ग निवडुन त्या दिशेकडे वाटचाल करावी. वर्ग १० वी चे वर्ग शिक्षक सेलोकर सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की विद्यार्थ्यांनो शिस्त हा जीवनाचा पाया आहे , शिक्षक फक्त शिकविण्याचे कार्य करित नाही तर चांगले संस्कारी विद्यार्थी घडावे , उत्कृष्ट नागरिक घडावे यासाठी धडपडत असतात . विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आई वडीलांचे नाव मोठे करावे. मधुकरजी सेलोकर यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या. वर्ग १०वी ची विद्यार्थीनी जागृती कोसरे यांनी शिक्षकांविषयी भावनिक मनोगत व्यक्त केले,

# शिव वैभव ज्ञान परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ एकविध क्रीडा संघटना व हिंदवी प्रतिष्ठान भंडारा चे आयोजन ◆ ४०० च्या वर स्पर्धकांनी घेतला सहभाग

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**भंडारा**:- एकविध क्रीडा संघटना व हिंदवी प्रतिष्ठान भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिव छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव २०२६ च्या अनुषंगाने शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ सर्व वयोगटासाठी सामुहिक ओपन, शिव वैभव ज्ञान परीक्षा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत दुपारी ३ वाजता नूतन कन्या शाळा भंडारा येथे नुकतीच घेण्यात आली.

कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी स्पर्धेचे मार्गदर्शक मोहन दाढी होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन कन्या विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या निलू तिडके, एकविध क्रीडा संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत इलमे, प्रा. नदिम खान, सचिव सुनिल कुरंजेकर, कुस्ती मार्गदर्शक विलास केजरकर, विवेक चटप, अरुण बांडेबुचे, क्रीडा शिक्षक बेनीलाल चौधरी, योगेश कुंभारे, अंकीत भगत, आशिक चूटे, सागर साखरे इत्यादी उपस्थित होते.

एकविध क्रीडा संघटना व हिंदवी प्रतिष्ठान भंडाराच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा स्मृतिचिन्ह व




पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर विविध मार्मिक उदाहरण देऊन मार्गदर्शन केले.

शिव वैभव ज्ञान परीक्षेला ४०० च्यावर स्पर्धकांनी घेतला होता. सहभाग सहभागी सर्वच स्पर्धकांना यातसेच अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्यांना स्पर्धकांना श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रेल्वे ग्राउंड खात रोड भंडारा येथे १९ फेब्रुवारी २०२६ ला सकाळी १० वाजता विविध स्पर्धांचे रोख रक्कम, मेडल व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुत्रसंचालन सुनील कुरंजेकर व प्रास्ताविक सुर्यकांत इलमे यांनी केले तर उपस्थितांचे आभार बेनीलाल चौधरी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर्या सार्वे, प्राची सतेकार, उर्वशी धांडे, सृष्टी रोटके, गुंजन हजारे, पुनम कावळे, राशी तितीरमारे, प्रणन्या बानेवार, शौर्या धार्मिक, हेमाक्क्षी टांगले, वैष्णवी राऊत, कार्तिकी शेंडे, मिस्ट्री उरकुडे, त्रिशा हुमे, किर्ती निपाने, आचल राऊत इत्यादी, एकविध क्रीडा संघटना व हिंदवी प्रतिष्ठान भंडाराच्या पदाधिकारी तसेच नूतन कन्या विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्त्याचे धनादेश वाटप

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. १५ :** कोरोना महामारीच्या कठीण काळात जीवाची पर्वा न करता सेवा देणाऱ्या नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाडी सेविकांना शासनाकडून मंजूर झालेल्या प्रोत्साहन भत्त्याचे धनादेश शुक्रवार १३ फेब्रुवारी १६१५ रोजी वितरित करण्यात आले.

नगरपंचायत एटापल्ली येथे आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष रेखा गजानन मोहुर्ले यांच्या हस्ते सर्व अंगणवाडी सेविकांना धनादेशांचे वाटप करण्यात आले. कोरोना काळात घराघरांत जाऊन सर्वेक्षण, लसीकरण जनजागृती, अन्नधान्य वितरण आणि आरोग्यविषयक सेवा बजावताना अंगणवाडी सेविकांनी बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण होती. त्यांच्या योगदानाची दखल घेत शासनाने हा प्रोत्साहन भत्ता मंजूर केला होता.

या प्रसंगी न.पं. बांधकाम सभापती निर्मला जयेंद्र कोंडबतुलवार, नगरसेविका निर्मला हिचामी, नगरसेवक राघवेंद्र सुल्वावार, राहुल कुळमेथे उपस्थित होते. तसेच गुलशन शेख, वच्छला तलांडे, लता कोकुलवार, छाया रामटेके, लिलाबाई गेडाम, प्रेमिला ओलालवार, कविता मुलमुले, सुमन गावडे, हंसमाला कूंभारे, कौतुका रामटेके, अनुसुया झाडे व करुणा मडावी या अंगणवाडी सेविकांची विशेष उपस्थिती होती.

# जिल्ह्यात हर हर महादेव... चा गजर

## मार्कंडेश्र्वराची महापूजा आ.डॉ.नरोटे यांच्या हस्ते



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.१५ :** विदर्भाची कांशी श्री श्रेत्र मार्कंडादेव महा. शिवरात्रीच्या पावन पर्वावर प्रारंभी महापुजा श्री शंकर भगवानाच्या शिवालिगांच्या पुजेचा आ.डॉ. मिलिंद नरोटे, डॉ.वैशाली नरोटे हस्ते तर महापुजेचे यजमान पुजारी पंकज पांडे, शुभांगी पांडे, व वैशाली भांडेकर नगरसेविका रोशनी वरघंटे, कक्ष अधिकारी पुरुषोत्तम निंदेकर पत्नी योगिता निंदेकर, प्रांची भिवापुरे, हे पूजेचे यजमान होते

यावेळी पूजेला पुजारी श्रीकांत पांडे, रामू महाराज गायकवाड मनोज हेजिप उपस्थित होते.यावेळी नाना महाराज आमगावकर यांनी मंत्रोचाराने महापूजा संपन्न झाली.

यावेळी महापूजेला देवस्थानचे अध्यक्ष गजानन भांडेकर, सचिव मृत्यूंजय गायकवाड, सहसचिव रामूजी पाटील तिवाडे, रामप्रसाद महाराज मराठा धर्म शाळेचे अध्यक्ष गंगाधर कोंडूकवार, उपनगराध्यक्ष लोमेश बुरांडे, नगरसेवक अमोल गण्यरपवार, अमोल आईचवार, संजय वडेट्टीवार, यश गण्यारपवार, पंकज वायलालवार, यांनी मार्कंडेश्वराचे दर्शन घेतले. यांच्यासह लाखोच्या संख्येने भाविकांनी दर्शन घेतले.

या महाशिवरात्रीला अनन्य साधारण महत्व असल्याने भक्तगण भल्या पहाटे पासूनच रांगेत दर्शनासाठी उभे होते ती रांग भल्ली मोठी दीड दोन की. मी होती. यासाठी भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मार्कंडेश्वर देवस्थानच्या वतीने बॅरिकेटिंग पासून स्तनदा माता, अपंग, गरोदर महिला, वृद्ध व्यक्ती यासाठी चांगली सोय केल्याने दर्शनासाठी सोय केली होती

शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त व सुरक्षा दिसून आली. महापूजेनंतर सुद्धा भक्तांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या आणि प्रचंड भाविकांची गर्दी दिसून आली. दिवसभरात लाखोंच्या संख्येने श्री मार्कंडेश्वराच्या शिव. लिगांचे दर्शन घेतले.

दरम्यान माजी आमदार डॉ.देवराव होळी पत्नी बिनाराणी होळी यांच्यासह दिलीप चलाख, जयराम चलाख, खासदार अशोक नेते भाजपाचे जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांनीही मार्कडेश्वराचे दर्शन घेत पूजा अर्चा केली.

दर्शनासाठी रांगेत पहिला असलेल्या मार्कंडादेव येथील जितू आबाजी कोवे व भूषण चंदू मरस्कोल्हे या वारकऱ्यांचेही शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

## अरतोडी महादेव गडावर परसराम टिकले यांच्या हस्ते महापूजा



**आरमोरी :** तालुक्यातील पळसगाव अरतोडी महादेव गडावर दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सुध्दा महाशिवरात्री निमित्त भगवान महादेव गडावरील मंदिरात देसाईगंज पं.स.चे माजी सभापती परसराम टिकले यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. यावेळी देवस्थान कमिटीचे वनपरिक्षेत्र अधिकारी विधाते, निवृत पोलीस अधिकारी दिलीप वरखडे, पळसगावचे क्षेत्र सहाय्यक बोरकर, एफडिसिएम क्षेत्र बारस्कर, सहाय्यक लट्याये, अध्यक्ष पुंडलिक घोडाम, उपाध्यक्ष श्रीराम ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप घोडाम, गणेश मातेरे, घनश्याम माकडे, रमेश वाढई, रामजी मानकर, रेवनाथ चव्हारे, रामकिसन ढोरे, ललीता टिकले, दुर्वास नाईक, तुळशिदास बांडे, पुराणिक गायकवाड, हिरालाल कानतोडे, अशोक भोयर, नरहरी पिलारे, देवस्थान कमेटीचे सदस्यगण व भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या ठिकाणी महाशिवरात्री निमित्त पुजा अर्चा करण्यासाठी सकाळपासून भाविकांची रांग लागली होती. भाविकाची गैरसोय होऊ नये म्हणून महादेवगड पहाडी सार्वजनिक देवस्थान यांनी आपत्ती व्यवस्थापन पोलीस विभाग, तहसिल, ग्रामपंचायत, वनविभाग, वनविकास महामंडळ या विविध विभागांकडून सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.

## वन्यप्राणी चितळाचे मास व चामडे जप्त, चार जणांना अटक



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.१५ :** येथील वन परिक्षेत्र अंतर्गत भडभीडी उप वन क्षेत्रातील रेखेगाव जंगल परिसरात धाड टाकत वन्यप्राणी चितळाचे मांस व चामडे जप्त करून चार जणांवर कारवाई केल्याची घटना १२ फरवरीला घडली गुप्त माहितीच्या आधारे येथील वन परिक्षेत्र अंतर्गत भडभीडी उपवन क्षेत्रातील रेखेगाव जंगल परिसरात धाड टाकत घटनास्थळी ११.४०० वजनाचे वन्यप्राणी चितळाचे मास व चामडे जप्त करीत राजीव कांदो, वैभव तिमा, नरथ कोवासे, संतोष हेडा रा रेखेगाव या चार जणांना वन्य जीव अधिनियम १९७२ नुसार गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

सदर कारवाई चामोर्शी वनपरिक्षेत्राधिकारी आर बी इनवते यांच्या मार्गदर्शनात भडभीडी क्षेत्रसायक व्ही.ऐस.चांदेकर, वनरक्षक आर.बी.राऊत, धानारकर कुलेटी, दांडिकवार, शामराव आडे. संतोष यांच्यासह शामराव कांदे व संतोष इनाम या पंचसमक्ष कारवाई केली.

## शिवरायांचा अपमान सहन केला जाणार नाही - भाजपा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.१५ :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ दि.१५ फेब्रुवारीला इंदिरा गांधी चौकात भारतीय जनता पार्टी शहर व जिल्हा गडचिरोलीच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व माजी खा.डॉ. अशोक नेते, जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांनी केले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्यासोबत करण्यात आल्याने राज्यातील जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांच्या महान कार्याची तुलना कोणाशीही करणे हा त्यांचा अवमान असल्याची तीव्र भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या आंदोलनात नगराध्यक्षा अँड.प्रणिता निंबोरकर, उपनगराध्यक्ष निखिल चरडे, समन्वयक प्रमोद पिपरे, जिल्हा महामंत्री गोविंद सारडा, शहराध्यक्ष अनिल कुनघाडकर, सभापती मुक्तेश्वर काटवे, हर्षल गेडाम, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा योगिता पिपरे, नगरसेवक सागर निंबोरकर, शेखर आखाडे आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची सीईटी अर्ज भरण्यासाठी धावपळ

**तालुका प्रतिनिधी**
**मुलचेरा दि.१५ :** अतिदुर्गम आणि आदिवासीबहूल असलेल्या मुलचेरा तालुक्यात डिजीटल इंडियाच्या गप्पा फोल ठरतांना दिसत आहेत. एमएच-सीईटी परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू आहे. या भागात नेटवर्क यंत्रणा ठप्प पडली असल्याने विद्यार्थ्यांना दुसऱ्या तालुकास्थळी जाऊन अर्ज भरावा लागला. तालुक्यात विज्ञान आणि कला शाखेची सहा कनिष्ठ महाविद्यालयचे आहेत. बारावीनंतर अभियांत्रकी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी सीईटी परीक्षा अनिवार्य असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील इंटरनेट सेवा विस्कळीत असल्याने ऑनलाईन पोर्टल्वर अर्ज भरणे अशक्य झाले आहे.

## नगर परिषदेसाठी दोन रूग्णवाहिका तातडीने उपलब्ध करून द्या– नगराध्यक्ष प्रणोती निबोंरकर



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.१५ :** शहर व जिल्ह्यातील वाढत्या आरोग्य गरजांचा विचार करता गडचिरोली नगर परिषदेसाठी दोन अत्याधुनिक रुग्णवाहिका तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी ठाम व तातडीची मागणी नगराध्यक्ष अँड प्रणोती सागर निबोंरकर यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री ना.प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली.

मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या गडचिरोली दौऱ्यादरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे आयोजित आरोग्य सेवेबाबतच्या आढावा बैठकीदरम्यान नगराध्यक्षांनी आरोग्यमंत्र्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर झालेल्या बैठकित त्यांनी रूग्णवाहिकांबाबची मागणी जोरदारपणे मांडली. सध्या उपलब्ध रुग्णवाहिका अपुऱ्या पडत असून आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नगराध्यक्षांनी जिल्ह्यातील एकूण आरोग्य व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करत जिल्हा सामान्य रुग्णालयातील सुविधा, वैद्यकीय मनुष्यबळाची कमतरता, अत्यावश्यक औषधसाठ्याची उपलब्धता तसेच ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थिती याकडे आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागामुळे गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य सुविधा अधिक सक्षम आणि तत्पर असणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा नगराध्यक्षांनी व्यक्त केली. मंत्री प्रकाश आबिटकर यांनीही संबंधित मागण्यांचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या बैठकीदरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सर्पदंश झाल्याने चिमुकलीचा मृत्यु



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.१५ :** चामोर्शी तालुक्यातील येगडी येथील एका निरागस चिमुकलीचा सर्पदंशाने शुक्रवारी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. नायरा तानाजी कुकडकर (५) रा.आमगाव महाल मृत चिमुकलीचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, नायरा ही घराजवळच खेळत असतांना तिला सापाने चावा घेतला. कुटुंबीयांनी तातडीने आमगाव महाल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तिला दाखल केले. मुलीची प्रकृती अधिकच गंभीर झाली. नायरा हिला तातडीने चामोर्शी येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. येथील डॉक्टरांनी प्राथमिक तपासणीनंतर सर्पदंशाची शक्यता व्यक्त केली. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

## राज्याची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी ‘सर्च’चे सहकार्य घेऊ - आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.१५ :** राज्याचे आरोग्य मंत्री ना.प्रकाश आबिटकर यांनी नुकतीच गडचिरोली येथील ‘सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ’ (सर्च) म्हणजेच ‘शोधग्राम’ प्रकल्पाला सदिच्छा भेट दिली. यावेळी गडचिरोलीचे आ. डॉ.मिलिंद नरोटेही उपस्थित होते.

या भेटीदरम्यान ‘सर्च’चे संस्थापक संचालक डॉ.अभय बंग आणि डॉ.राणी बंग यांच्याशी गडचिरोली आणि राज्यातील आरोग्य व्यवस्थेतील सुधारणांबाबत सविस्तर चर्चा केली.

आशा स्वयंसेविका या सार्वजनिक आरोग्याचा कणा असून, गावोगावी आरोग्य सेवा पुरवण्याचं सर्वात महत्वाचं काम त्या करत असतात. सर्चद्वारे धानोऱ्या तालुक्यातील आशा स्वयंसेविकांना प्रशिक्षण दिले जाते. शासकीय दवाखाने, आरोग्य केंद्रांच्या सुधारणेबरोबरच आशा स्वयंसेविकांचं सक्षमिकरण व्हावे. त्यांच्यावरील ताण कमी करण्यासोबतच कौशल्य विकासावर भर देण्यात यावी, ग्रामीण आरोग्यातील समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी ग्रुप मिटींगद्वारे संवाद साधण्याची सर्वाधिक गरज असल्याचे प्रतिपादन डॉ.बंग यांनी केले.

डॉ.राणी बंग यांनी गडचिरोलीतील दारु, खर्रा आणि तंबाखुच्या व्यसनाच्या गंभीर समस्येबाबत आरोग्य मंत्र्यांना सविस्तर माहिती दिली. गडचिरोली जिल्हा नियोजन व विकास समितीच्या वार्षिक बजेटच्या दुप्पट खर्च दारु-तंबाखुच्या सेवनावर होत असतो, महिलांमध्यही खर्रा तंबाखूंचं प्रमाण मोठ्या प्रमाणात होत असून त्याची सर्रास विक्री होत असते. यावर नियंत्रण आणण्याची गरज असल्याचे डॉ. बंग म्हणाले.

यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्व.ठाकूरदास बंग यांच्या समाधीला अभिवादन केले. डॉ.बंग यांच्यासमवेत शोधग्रामची पाहणी करत सर्चबद्दल सविस्तर माहिती घेतली.

## नविन कामगार कायद्याला विरोध

**सिरोंचा :** केंद्र सरकारने लागू केलेले चार नवे श्रम कायदे तत्काळ रद्द करावेत या मागणीसाठी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाला सिरोंचा तालुका आयटक शाखेने पाठिंबा दिला. यासंदर्भात सिरोंचा येथील तहसीलदारां मार्फत केंद्र शासनाला निवेदन पाठवून निषेध नोंदविण्यात आला. निवेदनात केंद्र शासनाचे चारही श्रम कायदे पूर्णतः कामगारविरोधी आणि कहर्पोरेट कंपन्यांचे हित जोपासणारे आहेत, हे कायदे कंत्राटी कर्मचारी, असंघटित क्षेत्रातील मजूर आणि शेतमजूरांच्या हक्कावर गदा आणारे असून त्यांचे स्वातंत्र्य धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

## गोंडवाना विद्यापीठात तीन दिवसीय क्रिडा व कला महोत्सव

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.१५ :** विद्यापीठाच्या गोंडवाना शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधील कलागुणांना वाव देऊन त्यांच्यामध्ये खेळांप्रती उत्साह निर्माण व्हावा, याकरिता गोंडवाना विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील जवळपास ४५० शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी १६ ते १८ फेब्रुवारीला तीन दिवस गोंडवाना विद्यापीठ परिसरात अमृत कला व महोत्सवाचे आयोजन क्रीडा करण्यात आले आहे.

यंदा या महोत्सवाचे पाचवे वर्ष असून दि.१६ फेब्रुवारी रोजी १२.३० वाजता, विद्यापीठाच्या सभागृहात अमृत क्रीडा व कला महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारेत, प्रमुख उपस्थिती म्हणून श्रीराम कावळे, विशेष अतिथी म्हणून रातुम नागपूर विद्यापीठाचे ललीत कला विभाग प्रमुख डॉ.संयुक्ता थोरात, प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध गायक अरविंद गेडाम आदी उपस्थित राहणार आहेत.

## भाविक -भक्तगणांची तहान भागवण्याचे चामोर्शी पत्रकारांचे कार्य अभिनंदनीय - एसडीपीओ सुरज जगताप



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.१५ :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर चामोर्शी पत्रकार समितीने तब्बल २० वर्षापासून ‘पाणपोई’ चा उपक्रम सुरू केलेला आहे. परंतु कोणतेही कार्य करण्याची इच्छा असून चालत नाही तर ते कार्य करण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती असावी लागते आणि हे सर्व करण्याचं कार्य चामोर्शी पत्रकार समिती नित्यनेमाने दरवर्षी करत येत आहे आणि भविष्यातही करत राहील हे मी हमखास सांगू इच्छितो. महाशिवरात्री निमित्त भरणाऱ्या यात्रेत भाविकांची तहान भागवून पाण्याच्या रूपात श्जीवन श् दानाचे कार्य करणाऱ्या पत्रकारांचे कार्य हे प्रशंसनीय असल्याचे परखड मत कार्यक्रमाचे उद्घाटक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सूरज जगताप यांनी मार्कंडादेव येथे पत्रकार समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या पाणपोईच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी प्रतिपादन केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पत्रकार प्रा.रत्नाकर बोमिडवार हे होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक दीपक डोम, मार्कंडेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष गजाननराव भांडेकर, चामोर्शी पत्रकार समितीचे अध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष लोमेश बुरांडे, शासकीय कंत्राटदार अमोल आईंचवार, नरेश बावणे, जेष्ठ पत्रकार बबनराव वडेट्टीवार, अयाज शेख, गजानन बारसागडे, कालिदास बन्सोड, चंदू कुनघाडकर, अमित साखरे, नरेंद्र सोमनकर, श्रीमंत सुरपाम, श्रावण वाकोडे हस्ते भगत आदी उपस्थित होते.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक दीपक डोम यांनी चामोर्शी पत्रकार समिती द्वारा सुरु केलेली पाणपोई ही भाविकांसाठी व यात्रेकरूंसाठी वरदान असून समाजोपयोगी कार्य असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन बारसागडे, प्रास्ताविक कालिदास बन्सोड तर आभार चंद्रकांत कुनघाडकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व तालुका पत्रकारांनी मोलाचे योगदान दिले.

## पळसगाव शेतशिवारात नवीन विद्युत रोहित्र मंजूर करा

### आ.मसराम यांच्याकडे शेतकऱ्यांची मागणी



**तालुका प्रतिनिधी**
**आरमोरी दि.१५ :** आरमोरी तालुक्यातील पळसगाव शेतशिवारातील कृषी पंपाचे विद्युत रोहित्रावर गेल्या बरेच महिन्यांपासून एकाच विद्युत रोहीत्रावर अतिभार असल्याने आता सध्या भरपूर प्रमाणात उन्हाळी धान पिक रोवण्याला सुरुवात झाली काही शेतकऱ्यांचे रोवणेही झाले परंतु आता धान मका या पिकांना भरपूर पाणी लागत असताना विद्युत जनित्र बरोबर काम करीत नसल्याने कृषीपंप वारवार बंद पडतात काहीचे पंप तर काहीचे वायर खराब झाल्याने धान पिक पाण्या अभावी वाळत आहे यात परीसरातील जवळपास २५ शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने लावलेला खर्चही निघने कठिण झाले असून सध्यातरी शेतकऱ्यांना कर्ज बाजारी होण्याचे दिसत असल्याने पळसगाव परीसरातील शेतकऱ्यांची आमदार रामदास मसराम यांच्याकडे धाव घेऊन पळसगाव शेतशिवारातीद विद्युत रोहीत्रावर अतिभारीत असल्याने भार दुभाजन करण्यासाठी नवीन कृषी पंप विद्युत रोहित्र मंजूर करण्यात यावे अशी मागणी आ. रामदास मसराम यांच्याकडे केली असता यात कसलाही विलंब न लावता आमदार मसराम यांनी विज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता खांडेकर यांना आपण प्रस्तावित केलेले विविध शेतशिवारातील नवीन विद्युत रोहीत्र तातडीने मार्गी लावण्यात यावे असे निर्देश दिले. यासंबंधी विज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता खांडेकर यांनी लवकरात प्रलंबित कामे निकाली काढण्याचे आश्वासन आ.मसराम यांना दिले आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप घोडाम, राजेंद्र मने, खुमा गरफडे, देवनाथ झलके, बाबुराव मने, शालिक वैध, मिथुन मने, कातीक मातेरे, नरेंद्र गोधोळे, मच्छिंद्र मेत्राम, संतोष काबळे, सुभाष गोधोळे, दुयबाळ धोटे, तुषार गोधोळे, रेवन मातेरे, युवराज धोटरे, विनोद मातेरे उपस्थित होते.

**कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, चामोर्शी यांचे न्यायालय**

राजस्व प्रकरण क्रमांक/जन्म-मृत्यु/१९८
मौजा :- चांदेश्वर
ग्राम पंचायत - वायगांव

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व जनतेला सुचित करण्यात येत आहे की, श्री.आनंदराव बालाजी मिसार वय ५० वर्षे, रा.चांदेश्वर ता.चामोर्शी, जि.गडचिरोली यांचे स्वता:चे जन्माची नोंद करणे बाबतचे आदेश मिळणे करीता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक, आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक नमुना 2025/(ई.आ.991181) प्र.क्र. 22/कु.क.दिनांक 12 मार्च 2025 नुसार जन्म मृत्यु नोंदणी बाबतची कार्यपध्दती निश्चित करणे या अन्वये अर्ज दाखल करून गाम पंचायत वायगांव येथुन जन्म/मृत्यु नोंदीचा दाखला मिळण्यास अर्ज सादर केलेला आहे. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार त्यांची जन्म तारीख 02/07/1975 जन्म स्थळ - चांदेश्वर हे असुन ग्राम पंचायत वायगांव अंतर्गत येत असल्याचे नमुद केलेले आहे.

वरील प्रमाणे प्रकरणात चौकशीची कार्यवाही सुरू आहे. सदर बाबतीत कुणाचे काही उजर/तक्रार/आक्षेप असल्यास त्यांनी पुराव्यासहीत तहसिल कार्यालय चामोर्शी येथे आस्थापना शाखा (कक्ष क्रमांक 01 मध्ये दिनांक : 28/02/2026 चे पुर्वी लेखी स्वरूपात सादर करावे.) मुदतीनंतर प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप/अर्ज स्विकारण्यात येणार नाही. व प्रकरणात निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 12/02/2026
ठिकाण :- चामोर्शी

स्वा/-
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी चामोर्शी

## पं. स. कार्यालयात विष प्राशन केल्याने खळबळ

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. १५**

स्थानिक पंचायत समिती कार्यालयात एका व्यक्तीने विष प्राशन केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, १२ फेब्रुवारीरोजीसकाळी ११ वाजता उघडकीस आली, या घटनेमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली, संबंधित व्यक्तीवर सेवाग्रामच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत, वाई येथील रहिवासी आशीष मसराम हे काही मागण्यासंदर्भात पंचायत समिती कार्यालयात आले होते, त्यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमा कार्यालयात ठेवली, त्यानंतर काही समजण्याच्या आतच त्यांनी विष प्राशन केले, घटनेची माहिती मिळताच पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचा-यामध्ये एकच गोंधळ उडाला, तत्काळ सतर्कता दाखवत काही कर्मचाऱ्यांनी आशिष मसराम यांना आर्वी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, तेथील प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले, या प्रकरणाबाबत अधिक माहिती अद्याप उपलब्ध झाली नाही.

# पांदण रस्त्यामुळे शेतकऱ्यांची वहिवाट होणार आता सुखकर !

### आमदार वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली पांदण रस्ते समिती झाली गठीत

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आवी , दि. १५**

आर्वी आष्टी व कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांचा शेतशिवारातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजने' अंतर्गत जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी आर्वी विधानसभा मतदार संघस्तरीय समिती जाहीर केली असून, अध्यक्षपदी आमदार सुमित वानखेडे यांची नियुक्ती केली आहे. शेतकऱ्यांना आता शेतात जाण्याचा मार्ग सुखकर होणार आहे.



पांदण रस्त्याअभावी शेतकऱ्यांना पावसाळ्यात अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. मात्र, आता 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजने' पांदण रस्त्याची रखडलेली कामे पूर्ण होणार असून, शेतकऱ्यांची समस्या सुटणार आहे.

**योजनेमुळे शेतकऱ्यांना मिळणार दिलासा**

शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, दर्जेदार बियाणे पुरवठा आणि खतांच्या उपलब्धता याकडे आमदार सुमित वानखेडे यांनी नेहमीच पुढाकार घेतला त्यामुळे आर्वी विधानसभा क्षेत्रात नवनवीन सिंचन प्रकल्प साकारत आहेत. मागील अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांसमोर पांदण रस्त्याचा प्रश्न जटील बनला होता. पावसाळ्यात आणि पीक काढणीच्या वेळी रस्त्यांअभावी शेतमाल वाहून नेणे जिकिरीचे ठरते. हीच अडचण ओळखून शासनाने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना' अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

**रखडलेल्या पांदण रस्त्यांचे काम होणार पूर्ण**

या समितीच्या माध्यमातून आता प्रशासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी थेट समन्वयाने काम करणार असून, रखडलेल्या रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण होण्यास मदत मिळणार आहे. या समितीचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ शासकीय अधिकारीच नसून, ग्रामीण भागाची भौगोलिक परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची जाण असलेल्या पाच प्रगतशील शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आष्टी येथील अशोक पुंडलिक विजयकर, आष्टी तालुक्यातील साहूर येथील प्रशांत वासुदेव काकपुरे, रोहणा येथील राजेंद्र गुलाब पावडे, आर्वी तालुक्यातील देऊरवाडा येथील सचिंद्र ज्ञानेश्वर कदम, कारंजा तालुक्यातील मेटहिरजी येथील जगदीश सुखदेवराव डोळे यांचा समावेश आहे. मतदारसंघातील गरजू आणि वंचित भागातील शेत रस्त्यांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. त्यामुळे आता पाणंद रस्त्याचा प्रश्न कायमचाच मार्गी लागणार आहे.

**शासनाच्या समितीत राहणार अधिकाऱ्यांचा समावेश**

पेरणीपासून पीक काढणीपर्यंत खते, बी-बियाणे आणि मजुरांची ने-आण करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागते. चिखल तुडवत शेतात जाण्याचे दिवस आता संपणार असून, पाणंद रस्त्यांमुळे कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार या समितीत तहसीलदार, गटविकास अधिकारी, भूमी अभिलेख अधीक्षक आणि बांधकाम विभागाचे अभियंते देखील सदस्य म्हणून कार्यरत राहतील. त्यामुळे आता आर्वी आष्टी आणि कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांची पाणंद रस्त्यांची समस्या सुटणार असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पुलवामा येथील शहिदांना विविध संघटनेकडून श्रध्दांजली



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी दि. १५**

पुलवामा येथे शहिद झालेल्या जवानांना विविध सामाजिक संघटनेकडून गांधी चौक येथील जयस्तंभाला पुष्प चक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहून अभिवादन करण्यात आले. श्रद्धांजली दरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम चे नारे लावण्यात आले.

कश्मीर येथील पुलवामा येथे आतंकवादी यांच्या कायरता पूर्ण हल्ल्यात भारत मातेचे ४० सैनिक शहीद झाले होते. या भ्याळ हल्ल्यात शहीद झालेल्या शहिदांना श्रद्धांजली वाहताना प्रथम राष्ट्रगीत म्हणून दोन मिनिटं मौन ठेवून श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार दादाराव केचे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लखन अग्रवाल होते. शहरातील विविध सामाजिक संघटनेच्यावतीने राजेश शिरगरे, रवींद्र खंडारे ,प्रशांत हेरोडे,राहुल काळे, पांडुरंग मलिये, शैलेश तलवारे, सूर्यप्रकाश भट्टड, नितीन आष्टीकर, गोपाल मरसकोल्हे ,शिरीष काळे,शोभा कानफाडे ,प्रभाकर निंबाळकर, अजय निंबाळकर, प्रमोद एडाखे, तौशिफ रजा, दशरथ जाधव ,अनिरुद्ध देशपांडे विनोद बावने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दर्पण टोकसे यांनी केले तर आभार गुड्डू पठाण यांनी मानले.

# सेंट जॉन्स हायस्कूल येथे मातृ-पितृ पुजा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. १५**

येथील सेंट जॉन्स हायस्कूलमध्ये पालकांचा आदर करण्यासाठी मातृ-पितृ पूजा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अनिल पंजवानी आणि रोहित राऊत, शाळेचे व्यवस्थापकीय संचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्य आरती कुरझाडकर, महेंद्र भोयर होते.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमेच्या पूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी गाणी, संगीत आणि त्यांच्या पालकांच्या सन्मानार्थ प्रतिकृती नृत्य सादर केले. कार्यक्रमाचा उद्देश त्यांच्या पालकांचा सन्मान, आदर आणि अभिवादन करणे हा होता. आजच्या धावपळीच्या जीवनात आपले पालकांकडे दुर्लक्ष होते. म्हणून हा कार्यक्रम त्यांचा सन्मान करण्यासाठी होता. प्रथम, विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांची देव म्हणून पूजा केली. विद्यार्थ्यांनी गोड बोलून कृतज्ञता व्यक्त केली. प्रमुख पाहुणे म्हणून असलेले प्रेरक वक्ते यांनी ओम ओमचा जप करून आणि मंत्रांचा जप करून विद्यार्थी आणि पालकांना संबोधित केले आणि पालक हेच देव आहेत हे स्पष्ट केले. पालकांनी सर्वांसमोर आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी त्यांच्या मुलांना सांगितले की पालक हे सर्वोत्तम देव आहेत आणि या कार्यक्रमाचा त्यांच्या हृदयाशी खोल संबंध आहे. अनिल पंजवानी, रोहित राऊत यांनी विद्यार्थ्यांना पालकांचे मुलांप्रती काय कर्तव्य आहे आणि मुलांचे पालकांप्रती काय कर्तव्य आहे. हे पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन अविष्कार उपाध्याय आणि सुश्री विधी पोकळे यांनी केले आणि कार्यक्रमाचा समारोप वंदे मातरम् ने केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल येथे वर्ल्ड पीस एथिक्स स्पर्धा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. १५**


आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि वेगाने बदलणाऱ्या जगात करुणा, संवेदनशीलता आणि नैतिकता हीच मानवतेची खरी ताकद आहे. शैक्षणिक यश करिअर घडवते; परंतु मूल्याधिष्ठित शिक्षण व्यक्तिमत्त्व घडवते—आणि व्यक्तिमत्त्वच समाज व राष्ट्र उभारते.याच उद्देशाने ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, वायगाव (निपाणी) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची 'वर्ल्ड पीस एथिक्स' स्पर्धा घेण्यात आली. चेतना एज्युकेशन सोसायटी अंतर्गत आयोजित या उपक्रमात एकूण १२७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

'वर्ल्ड पीस एथिक्स कॉन्टेस्ट' ही जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धा असून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, नैतिक आणि मानवी मूल्यांची जोपासना करणे हा तिचा मुख्य उद्देश आहे.या उपक्रमास थायलंडमधील मान्यवरांची उपस्थिती लाभली. वरिष्ठ सल्लागार वेनेरेबल किर्ती, प्रोजेक्ट आयोजक औचाली त्रिनेत, सीईओ मिथिला चौधरी आणि मीडिया प्रमुख सोमबुन बोनप्रसीथिकोल यांनी कार्यक्रमाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधोरेखित केले.विद्यार्थ्यांना चेतना एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. चेतना सवाई यांचे नेतृत्व लाभले आहे. तसेच शाळेचे प्राचार्य फादर डॉ. सुधीर जिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांच्या समर्पित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करता आले हे विशेष!

### बोरगाव (आलोडा) येथे युवकाची आत्महत्या

**वर्धा :** बोरगाव (आलोडा) येथे युवकाने गळफास घेऊन युवकाने आत्महत्या केली, ही घटना गुरुवारी १२ फेब्रुवारी रोजी घडली, अमन महेंद्र म्हैसकर (वय २२) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, त्याच्या आत्महत्येचे कारण कळू शकले नाही, याप्रकरणी तक्रारीवरुन अल्लीपूर पोलिसांनी नोंद केली, पुढील तपास अल्लीपूर पोलिस करीत आहे.

**रानडुकरांचा धुमाकुळ**



रानडुकराने टरबूजाच्या शेतात शिरुन शेतक-याच्या टरबूज पिकांचे हजारो रुपयांचे नुकसान केले.

# दोन वेगवेगळ्या ठिकाणी कारच्या धडकेत अपघात ; एक ठार तर दोघे जखमी

### भरधाव कारची धडक; पेट्रोलपंप कर्मचाऱ्याचा मृत्यू देवळी-यवतमाळ मार्गावरील अपघात, चालक पसार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**देवळी,दि. १५**

दोन वेगवेगळ्या ठिकाणी कारच्या धडकेत झालेल्या अपघातात एक ठार तर दोघे जखमी झाले. देवळी -यवतमाळ मार्गावर झालेल्या अपघातात पेट्रोलपंप कर्मचा-याचा मृत्यू झाला तर वर्धा येथील त्रिमूर्ती नगर येथे भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघे गंभीर जखमी झाले. देवळी यवतमाळ मार्गावर झालेल्या अपघातातील कारचा चालक घटनास्थळावरुन पसार झाला. तर त्रिमूर्तीनगर येथे झालेला अपघात हा महसूल विभागाच्या कर्मचारी यांच्या वाहनातून झाला असल्याचे घटनास्थळी बोलले जात आहे.






हलगर्जीपणामुळे वाहन चालविल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी पहाटे देवळी-यवतमाळ मार्गावर घडली. अपघातानंतर चालक वाहनासह पसार झाल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, मोहनिश गणेश लुंगसे (वय २३) रा. कोल्हापूर (राव), किशोर लक्ष्मण कन्नाके (वय २७) रा. देवळी हे दोघे नायरा पेट्रोलपंपावर काम करत होते. पहाटेच्या सुमारास ते दुचाकीने देवळी येथून परत पेट्रोलपंपकडे जात होते. दरम्यान, इसापूर शिवारात दरसार पेट्रोलपंपाजवळ मागून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनाने भरधाव वेगात धडक दिली. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना मदतीची आवश्यकता असताना संबंधित वाहन चालकाने थांबण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढला. अपघातात मोहनिष लुंगसे यांचा जागीच मृत्यू झाला, तर किशोर कन्नाके गंभीर जखमी झाले. याप्रकरणी तक्रारीवरून देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे. सुसाट वेगाने वाहन चालविणा-या वाहन चालकावर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## कारची दुचाकीला धडक, दोन युवक गंभीर जखमी





**वर्धा :** स्थानिक हिंदी विद्यापीठ रोड येथील त्रिमूर्ती नगर येथे भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. यात संकेत महेंद्र कळमकर ( वय २८) आणि अजय पातडे (वय २५) हे दोघे गंभीर जखमीं झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, संकेत आणि अजय हे दोघे त्रिमूर्ती नगर येथून बाजारात जात होते. दरम्यान, भरधाव वेगाने असलेली कार क्रमांक एमएच ३२ ए एक्स ०४५२ ही हिंदी विद्यापीठ येथून आर्वी नाक्याकडे जात असताना दुचाकी क्रमांक एमएच-३२ एएक्स ७०२६ यांना धडक दिली. ही कार दिनेश पुंडलिक मंडळकर रा. तुकडोजी वॉर्ड हिंगणघाट यांची असल्याचे दिसून आले आहे.यात ते दोघेही गंभीर जखमीं झाले. परिसरातील नागरिकांनी धाव घेत जखमी युवकांना डॉ भूषण पाटील यांच्याकडे वैद्यकीय उपचारासाठी दाखल केले. जिल्हा महसूल विभागाच्या क्रीडा स्पर्धा या महात्मा गांधी हिंदी विद्यापीठ येथील प्रांगणात सुरू आहे. ठ

त्यामुळे जिल्यातील सर्व तालुका यांच्या क्रीडा स्पर्धा सुरू असल्याने सर्व कर्मचारी व अधिकारी येथे खेळायला आले आहे. सदर अपघात हा महसूल विभागाच्या कर्मचारी यांच्या वाहनातून झाला असल्याचे घटनास्थळी बोलले जात आहे. वृत्त लिहेस्तोवर रामनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# लोककल्याण फाऊंडेशन तर्फे मोफत आरोग्य तपासणी

### शिबिरात ९५५ महिला पुरुषांची तपासणी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सिंदी रेल्वे दि.१५ :** लोककल्याण फाऊंडेशन व देअरफोर हेल्थ सर्व्हीसेस तर्फेनगर परिषद सभागृहात मोफत आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन शिबीर पार पडले यात ४८८ महिला व ४६७ पुरूष असे एकूण ९५५ लाभार्थींनी शरिराच्या विवीध तपासण्या अत्याधुनिक तांत्रिक मशीनव्दारे करुन घेतल्या.



ग्रामीण भागात तात्काळ वैद्यकीय सेवा मिळविने किंवा मिळने थोडं कठीण असते अशा परिस्थितीत रोगनिदान पुर्वतपासणीचे शिबीर तेही मोफत घेणे.ज्या तपासण्या करण्यासाठी दोन ते तीन हजार रुपये मोजावे लागते.म्हणजे फारच स्तुत उपक्रम म्हणावा लागेल असे गौरवोद्गार अँड सुधीर कोठारी यांनी काढले.ते शीबीराचे उद्घाटक म्हणून बोलत होते.यावेळी माजी आमदार राजु तिमांडे, नगराध्यक्षा राणी कलोडे, उपाध्यक्ष अकील शेख, नगरसेवक शरद तळवेकर, आशिष देवतळे,सहकार नेते बबन हिंगनेकर तसेच स्नेहल कलोडे, धनराज तळवेकर,शिवेश कावळे इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबीरात देअरफोर हेल्थ सर्व्हिसेस चे वृशांक तळवेकर, डॉ. ऐश्वर्या तळवेकर, डॉ. कोहळे, डॉ. रविंद्र शेटे, डॉ. सुरज राठोड, डॉ.चेतन रिगाणे, डॉ स्वप्निल तलमले डॉ.सौरभ चव्हाण आदींनी सहकार्य दिले शिबीराचे आयोजक शिवेश कावळे होते.दोन दिवस चाललेल्या शिबीराला वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, भाजपा प्रभाग अध्यक्ष मधु राऊत, इन्फीनिटी पॉवर सोल्युशनचे आकाश पाल , पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद छाजेड,मोहन सुरकार आदी मान्यवरांनी भेटी दिल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन भिकुलाल पालीवाल यांनी केले.आभार किशोर भांदकर यांनी मानले.शिबीराच्या यशस्विते करित्ता संगीता जयस्वाल, धनश्री पोकळे, दुर्गा पालीवाल, मनोज पेटकर, किशोर भांदककर, रवि जयस्वाल, पराग देवस्थळे, मयुर भुते, गोकुल ठाकरे, राज बावणकर,विलास तळवेकर ,गिरीधर कारमोरे, तुषार ठोंबरे, देवाशिष जबस्वाल, आयुष पालीवाल,खुशाल बोरकर,विपीन हाडके,वैभव मुंडाले,स्वप्नील भोले व मित्र परिवारांनी सहकार्य केले.

## टुईंग, किफायतशीर फूड ऍप, आता नागपूरमध्ये उपलब्ध



**नागपूर, १५ फेब्रुवारी :** टुईंग, एक नवीन किफायतशीर फूड डिलिव्हरी ॲप, ने आज नागपूर शहरात आपल्या सुरुवातीची घोषणा केली. या सुरुवातीपासून टुईंग आता देशातील ६ उदयोन्मुख शहरांमध्ये उपलब्ध आहे, ज्यामध्ये पुणे, आग्रा, वडोदरा, गुवाहाटी आणि नाशिक यांचा समावेश आहे. २०२५ च्या दुसऱ्या सहामाहीत पुण्यात पहिल्यांदाच सुरू झालेल्या या ॲपने आता नागपूरमध्येही सर्व्हिस सुरू केली असून शहरातील आघाडीचे रेस्टॉरंट्स आधीच प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध आहेत. टुईंग सर्वात कमी दरांची हमी देत असून रेस्टॉरंटच्या टेबल मेनूतील किमतीइतके किंवा त्यापेक्षा कमी दर देण्याची खात्री देते. याशिवाय कोणतेही पॅकेजिंग शुल्क किंवा प्लॅटफॉर्म फी आकारली जात नाही. यूजर बिर्याणी, बर्गर आणि बाउल्ससह विविध पदार्थ केवळ रु. ९९ पेक्षा कमी किमतीत ऑर्डर करू शकतात.

टुईंग हे फूड डिलिव्हरीला केवळ कधीतरी होणारी चैनीची गोष्ट न मानता रोजचा पर्याय बनवू इच्छितात अशा विद्यार्थ्यांसाठी, नोकरीची सुरुवात करणाऱ्या तरुणांसाठी आणि किमतीबाबत जागरूक असलेल्या जन झेड साठी तयार करण्यात आले आहे. दैनंदिन परवडणाऱ्या किमतींवर लक्ष केंद्रित करून टुईंग आपल्या यूजरला अतुलनीय मूल्य आणि विश्वासार्हता सुनिश्चित करते. या ॲपवर नागपूरमधील रामजीज फूड प्लाझा, हल्दीराम्स रेस्टॉरंट, बार्बेक्यू सदर, टू ब्रदर्स शावरमा एक्सप्रेस, व्हरायटी फूड्स आणि मुल्लाजी जिल्हा बिर्याणी सेंटर यांसारखी लोकप्रिय रेस्टॉरंट्स उपलब्ध असून नॉर्थ इंडियन, बिर्याणी, चायनीज, चाट आणि कॉन्टिनेंटल (फास्ट फूड) अशा विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे पर्याय दिले आहेत. व्हॅलेंटाईन डेच्या पूर्वसंध्येला सुरुवात झालेल्या या ॲपद्वारे ग्राहक बर्गर, पिझ्झा, मोमोज, बिर्याणी आणि रोल्ससारखे स्थानिक आवडीचे पदार्थ ऑर्डर करू शकतात.

## एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड ने त्यांचे तिसरे तिमाही आर्थिक वर्ष २६ निकाल केला जाहीर

**नागपूर, १५ फेब्रुवारी :** भारतातील आघाडीचा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड असलेल्या एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड (एलजीई इंडिया) ने आज आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत ४१.१४ अब्ज रुपयांचा महसूल मिळवला, जो आर्थिक वर्ष २५ च्या तिसऱ्या तिमाहीत ४३.९६ अब्ज रुपयांचा होता आणि आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत ४.८% इबीआयटीडीए मार्जिन होता.

सणासुदीनंतरच्या काळात अपेक्षेपेक्षा कमी मागणी असूनही, एलजीई इंडियाने होम अप्लायन्सेस आणि होम एंटरटेनमेंट विभागांसह प्रमुख श्रेणींमध्ये आपले बाजारातील अग्रस्थान कायम राखले आहे. यावरून कंपनीची मूळ ब्रँड ताकद आणि ग्राहकांचा विश्वास सिद्ध होतो.

निकालांवर प्रकाश टाकताना, एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी हॉंग जू जिओन म्हणाले, बाह्य घटकांमुळे गेल्या तिमाहीत मंदी असूनही, एलजीई इंडियाने प्रमुख बीटूसी विभागांमध्ये पहिले स्थान कायम ठेवले आहे. मजबूत मूलभूत तत्त्वे, नावीन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित करणे आणि दीर्घकालीन स्थिरतेवर लक्ष केंद्रित करून, आम्ही आमच्या नवीन बीईई-रेटेड पोर्टफोलिओला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे नवीन ताकदीने तिमाहीत प्रवेश केला आहे. उन्हाळा जवळ येत असताना, आम्ही आमच्या दोन ट्रॅक धोरणाद्वारे कॉम्प्रेसर उत्पादनांची मागणी मिळवण्यासाठी सज्ज आहोत प्रीमियम आणि 'एलजी इसेन्शियल' लाइनअपचा विस्तार करणे. आम्ही आमच्या उच्च-मार्जिनएएमसी व्यवसायाचे स्केलिंग आणि बीटूबी पायाभूत सुविधांच्या संधींचा फायदा घेण्यासाठी वचनबद्ध आहोत. यूएस टॅरिफचे तर्कसंगतीकरण 'मेक इंडिया ग्लोबल' या आमच्या वचनबद्धतेला आणखी गती देण्यास मदत करेल, कारण आम्ही देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि निर्यात वाढविण्यासाठी उत्पादन ऑप्टिमाइझ करतो. या घडामोडी ग्राहकांना आणि भागधारकांना समान मूल्य प्रदान करण्याच्या आमच्या क्षमतेवर अधोरेखित करतात आणि आम्हाला आमच्या दीर्घकालीन मार्गावर विश्वास आहे.

भविष्यात, अमेरिकेतील शुल्कात झालेली कपात आणि युरोपीय संघासोबतचा मुक्त व्यापार यामुळे निर्यातीच्या संधी वाढण्याची अपेक्षा आहे. पुढील आर्थिक वर्षात, मेक इन इंडिया अंतर्गत बनवलेल्या प्रीमियम उत्पादनांच्या जोरावर निर्यात दुप्पट करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये अमेरिका आणि युरोपचा समावेश असेल.

विशेषतः भारतासाठी, एलजीच्या प्रीमियम पोर्टफोलिओचा विस्तार करून दोन मार्गी धोरणावर लक्ष केंद्रित केले जाईल आणि त्याचबरोबर पहिल्यांदाच घरगुती उपकरणे खरेदी करणाऱ्यांसाठी डिझाइन केलेली एलजी इसेन्शियल लाइन अप मजबूत केली जाईल. त्याचप्रमाणे, श्री सिटीमधील तिसऱ्या प्लांटच्या कार्यान्विततेद्वारे एलजीई इंडियाच्या उत्पादन बेसचा विस्तार करण्यावर सतत लक्ष केंद्रित केले जाईल, तसेच आमच्या उत्पादन परिसंस्थेमध्ये स्थानिकीकरण वाढवले जाईल.

## नरेंद्र मोदी यांनी नागपूरला ५0 जेबीएम इकोलाइफ इलेक्ट्रिक बसेसना हिरवा झेंडा दाखवला



**नागपूर, १५ फेब्रुवारी :** महाराष्ट्रात शाश्वत सार्वजनिक वाहतूक मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आसाममधील गुवाहाटी येथून नागपूरला ५० जेबीएम इकोलाइफ इलेक्ट्रिक बसेसना व्हर्च्युअली हिरवा झेंडा दाखवला. पीएमई-बस्सेवा योजनेअंतर्गत देशभरात अनेक शहरांमध्ये एकूण २०० जेबीएम इलेक्ट्रिक बसेस लाँच करण्यात आल्या. नागपूरमधील हा कार्यक्रम महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, वरिष्ठ नेते, सरकारी अधिकारी आणि जेबीएम टीम सदस्यांच्या उपस्थितीत कोराडियागर येथील पीएम ई-बस्सेवा येथे आयोजित करण्यात आला होता. शहरातील स्वच्छ, आधुनिक आणि नागरिक-केंद्रित सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. नागपुरात ५० जेबीएम इकोलाइफ इलेक्ट्रिक बसेसची तैनाती ही शहराच्या सार्वजनिक वाहतूक परिसंस्थेला बळकटी देण्याच्या आणि भविष्यातील गतिशीलतेसाठी महाराष्ट्राला तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शहराच्या वाहतूक ताफ्यात या ९ मीटर लांबीच्या, कमी मजल्यावरील, वातानुकूलित इलेक्ट्रिक बसेसचा समावेश केल्याने शेवटच्या मैलापर्यंतची कनेक्टिव्हिटी, प्रवाशांची सोय आणि प्रमुख आंतरशहर मार्गांवर कार्यक्षमता सुधारण्याची अपेक्षा आहे.

# नागपूर कला संघच्या 'कला महोत्सव'चे थाटात उद्घाटन

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १५

युज फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित नागपूर कला संघच्या तिसऱ्या आवृत्तीचा शुभारंभ शनिवारी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स, आर्किटेक्चर अँड डिझाइन, मुंबईचे कुलगुरू प्रा. हिम चॅटर्जी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि 'कला' कार'चे अनावरण करून झाले. 'द फ्युचर इज नाऊ' या संकल्पनेवर आधारित हा सार्वजनिक कला महोत?सव व्हीआर नागपूर येथे महिनाभर चालणार आहे. शिवर लोककला संस्कृती संस्थानच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन लोकनृत्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. पाहुण्यांनी फाइन आर्ट गॅलरीसह विविध ठिकाणी उभारलेल्या कला इन्टालेशनची पाहणी केली. या महोत्सवात १२० हून अधिक कलाकृती, शिल्पे, चित्रे आणि छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. यामध्ये शासकीय चित्रकला महाविद्यालय - आर्ट अँड डिझाइन, नागपूर आणि श्री कला महाविद्यालय, नागपूर कला संघ येथील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचा समावेश आहे. 'कला' कार ही बहुविध माध्यमांतील कलाकार विनय चानेकर आणि शासकीय चित्रकला महाविद्यालयातील त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने साकारण्यात आली आहे. व्हीआर नागपूरच्या बेसमेंटमधील भिंतींना कला दालनाचे रूप देत 'बेसमेंट आर्ट प्रोजेक्ट' अंतर्गत श्री कला महाविद्यालयातील कलाकारांची कलाकृती प्रदर्शित केली जाणार आहे. महिनाभर कलाकृती, फाइन आर्ट व छायाचित्र प्रदर्शन, संगीत, आर्ट सिनेमा, कार्यशाळा, युवा कलाकार स्पर्धा आणि कारागीर बाजार अशा विविध कला उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. युनेस्कोच्या सहकार्याने 'पॉकेट्स ऑफ होप' हे छायाचित्र प्रदर्शन सादर करण्यात येत असल्याचे नागपूर कला संघाच्या क्युरेटर सुमी गुप्ता यांनी दिली.

### 'कला'कार ने वेधले उपस्थितांचे लक्ष



विदर्भातील युवा कलाकारांना सार्वजनिक कला महोत्सवात प्रत्यक्ष सहभागाचा अनुभव देणारे हे एकमेव व्यासपीठ आहे. वर्गखोल्या व गॅलरीच्या पलीकडे जाऊन थेट शहराशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. अशा वास्तव अनुभवातून पुढील पिढीतील कलाकार घडतात आणि शहराचे सांस्कृतिक भविष्य अधिक सक्षम होते. असे प्रा. हिम चॅटर्जी म्हणाले.

## हिट ॲन्ड रन'मध्ये वृद्धाचा मृत्यू

**नागपूर, दि. १५ :** घराजवळील कार्यक्रम आटोपून पायदळ घरी जात असलेल्या वृद्धाला मोटारसायकल स्वाराने जबर धडक दिली आणि पळून गेला. यात गंभीर जखमी वृद्धाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना खापरखेडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. श्रीकृष्ण बालाजी ढोके (६८) रा. माधवानी लेआऊट, भानेगाव असे मृताचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी ढोके यांच्या घराजवळच एक कार्यक्रम होता. ढोके या कार्यक्रमासाठी गेले होते. सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास कार्यक्रम आटोपल्यानंतर ते घराकडे निघाले. घरापुढेच रस्ता ओलांडत असताना मोटारसायकल क्र. एमएच-३१/डीजी-६२७१च्या चालकाने त्यांना मागून जबर धडक दिली आणि फरार झाला. धडकेमुळे ढोके समोर उभ्या ट्रकवर जाऊन आदळले. कुटुंबीयांनी त्यांच्या मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारार्थ मानकापूर परिसरातील खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी ढोके यांची मुलगी यशस्वी (२३)च्या तक्रारीवरून अज्ञात मोटारसायकलस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. वाहन क्रमांकाच्या आधारावर आरोपीचा शोध सुरू आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या बेजबाबदार वक्तव्याचा भाजपा युवा मोर्चा तर्फे नागपूरात तीव्र निषेध




युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. १५

छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून तमाम शिवभक्तांच्या भावना दुखावणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या बेजबाबदार वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा महाल येथे युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे यांच्या नेतृत्वात निषेध नोंदविण्यात आला सोबत महामंत्री रितेश पांडे, रिषभ अरखेल, कुलदीप माटे, संपर्क महामंत्री नागेश साठवने, मध्य विधानसभा समन्वयक अथर्व त्रिवेदी, मंडल अध्यक्ष सन्नी झेंडे, केतन साठवने, सुमित शाहू, रितेश पांडे, हर्षल वाडेकर, धवल आत्राम, प्रज्वल मंगर, अनुप समुंदरे, साहिल ठाकुर, लखन धुसिया, अदिति लांजेवार व मोठ्या संख्येने युवा मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## शालीमार एक्स्प्रेसमधून पर्स चोरी

**नागपूर, दि. १५ :**
रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांच्या सतर्कतेनंतरही, नागपूर स्थानकावर चोरांचा हैदोस सुरूच आहे. दररोजच प्रवाशांना लक्ष्य केले जात आहे. अशाच एका घटनेत, एका अज्ञात आरोपीने १८०२९ शालीमार एक्स्प्रेसमध्ये चढणाऱ्या प्रवाशाची लेडिज पर्स चोरी केली.
पर्समध्ये सोन्याचे लॉकेट, अंगठी, कानातले आणि मोबाईल फोन असा एकूण ४७,३०० रुपयांचे सामान होते. मिळालेल्या माहितीनुसार, छत्तीसगडच्या दुर्ग, भिलाई येथील रहिवासी वैभव सिंग पटेल (२५) हे त्यांच्या कुटुंबासह चुलत बहिणीच्या लग्नासाठी आले होते.
लग्नानंतर, ते दुपारी १ वाजता दुर्गला परतण्यासाठी प्लॅटफॉर्म ३ वर शालीमार एक्स्प्रेसमध्ये चढले. या दरम्यान त्यांना आढळले की त्यांच्या सामानातून एक लेडिज पर्स गायब आहे. पर्समध्ये मोबाईल फोन आणि दागिन्यांसह ४७,३०० रुपयांच्या वस्तू होत्या. वैभवने ट्रेनमधून उतरत प्लॅटफॉर्म ३ वर शोध घेतला, मात्र पर्स मिळाली नाही. अखेर त्यांनी लोहमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. जीआरपीने अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शिवटेकडीवर हर हर महादेवचा गजर

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
वाडी, दि. १५ :

हिंदू धर्मातील प्रवित्र सण म्हणजे महाशिवरात्री. भगवान महादेवाच्या विशेष उपासनेसाठी महाशिवरात्रीची ख्याती आहे . जीवनातील दुःख , अडचणी, पाप, आर्थीक समस्या दूर करण्यासाठी या दिवशी महादेवाची भक्तिभावानाने उपासना केली जाते. विनाशाची देवता म्हणूनही भोले शंकराची ख्याती आहे . महाशिवरात्री निमीत्य मंगलधाम सोसायटी मधील सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्ट तर्फे शिवटेकडी वरील सार्वजनिक शिवमंदीरात रविवार १५ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. सकाळी ओम नम शिवाय , हर हर महादेवच्या गजराने परिसर भक्तीमय झाला. आमदार समीर मेघे, नगराध्यक्ष नरेश चरडे, सार्वजनिक शिवमंदीर ट्रस्टचे अध्यक्ष तथा नगरसेवक कमल कनोजे , सचिव सीमा कनोजे , दिवाणजी रहांगडाले, नगरसेविका लीलाबाई रहांगडाले, ज्ञानेश्वर चोपडे,मिनाक्षी चोपडे, जितेंद्र रहांगडाले, गायत्री रहांगडाले, विक्रम तिजारे, विजया तिजारे , धर्मेंद्र कनोजे, शेरसिंग पटले, अनिल घागरे , मंदा घागरे यांच्या उपस्थितीत होमहवन व अभिषेक करण्यात आला . यावेळी चंद्रशेखर देशभ्रतार, राजेंद्र बिसेन , बापुसाहेब लिमकर , देवा खाटीक , सुबोध शर्मा , गजेंद्र देवघरे ,सुकलाल पटले , सतिश नांदनकर , राकेश शिवणकर , शेरसिंह पटले , राकेश चौधरी,सुनील कुबडे, विनोद शर्मा , मिलींद काचोरे,जितू तांडेकर, नितीन सावरकर, वसंतराव घडीनकर, सौरभ घडीनकर ,सुषमा गौर , सुचिता घोडे , दयावती माटुरकर ,माधुरी ठाकरे , जया पहूरकर उपस्थित होते.



जीवनातील दु:ख , अडचणी, पाप, आर्थीक समस्या दूर करण्यासाठी या दिवशी महादेवाची भक्तिभावानाने उपासना केली जाते

## लाचखोर कर्मचाऱ्याला २ दिवसांची कोठडी

**नागपूर, दि. १५ :** बेला येथील अपर तहसील कार्यालयात महसूल सहाय्यक असलेल्या विजय भगवान शडमाके याला शुक्रवारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना रंगेहात पकडले होते. शनिवारी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची २ दिवसांच्या कोठडीत रवानगी केली. तक्रारकर्त्याने त्याच्या जमिनीच्या सातबाऱ्यात दुरुस्ती करण्यासाठी आणि आईचे नाव वगळण्यासाठी बेला येथील अपर तहसील कार्यालयात अर्ज केला होता. हा अर्ज महसूल सहाय्यक विजयकडे गेला. त्याने विजयला काम करून देण्यासाठी ४ हजार रुपयांची लाच मागितली.

## आज देशव्यापी संप सफल करा : सीटूचे आवाहन

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
वाडी, दि. १५

मोदी सरकारने २९ कामगार कायदे रद्द करून भांडवलदार धार्जिण्या व कामगारविरोधी चार श्रम संहितांना २०२० मध्ये संसदेत कोणतीही सविस्तर चर्चा न करता मंजुरी दिली. या चारही श्रम संहितांविरोधात गेल्या चार वर्षांपासून देशभरातील कामगार संघटनांनी सातत्याने आंदोलन व विरोध केला. तरीही केंद्र सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी या संहितांच्या अंमलबजावणीची अधिसूचना जारी केली.या पार्श्वभूमीवर देशातील १० केंद्रीय ट्रेड युनियन व ५५ फेडरेशन यांच्या वतीने १२ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय संप पुकारण्यात आला आहे. सोमवार १६ फेब्रुवारी रोजी होणारा हा देशव्यापी संप यशस्वी करण्याचे आवाहन सीटू (CITU) तर्फे करण्यात आले आहे. सीटूचे महासचिव कॉ. विठ्ठल जुनघरे यांनी सर्व सीटू संलग्न युनियन, कामगार व कर्मचारी वर्गाने एकदिवसीय संपात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. तसेच सकाळी ११ वाजता खंडोबा देवस्थान येथून संविधान चौकापर्यंत निघणाऱ्या भव्य मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले.

**संपाच्या प्रमुख मागण्या :**

- चारही श्रम संहिता तात्काळ रद्द कराव्यात.
- शेतीमालासाठी किमान समर्थन मूल्याचा (MSP) कायदा मंजूर करावा.
- व्हीबीजी (VBG ) योजना रद्द करून मनरेगा योजना पूनर्जीवित करावी.
- सर्व योजना कर्मचारी, शालेय पोषण आहार कामगार, आशा व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा व किमान वेतन २६,००० रुपये लागू करावे.
- शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी.
- सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण थांबवावे.
- कामगार, शेतकरी व सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी हा संप असल्याचे सांगत सीटूने सर्व स्तरातील नागरिकांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले आहे.

## स्मशान भूमीत शंकराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, मौदा, दि. १५ :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर लाखो भाविकांनी तालुक्यातील धानला येथील स्मशानभूमीत शंकराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. स्मशान भूमी सह गावातील भक्तांच्या गर्दीने सर्वच ठिकाणची शिवालये फुलून गेली होती. परिसरातील पहाटेपासूनच मंदिरात पूजा-अर्चना,अभिषेक, महाआरती व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यात सर्वत्र यात्रा आणि उत्साहाचे वातावरण होते. धानला येथे आयोजित महाशिवरात्रीनिमित्त स्मशान भूमीत भाविकांची गर्दी उसळली, भाविक भक्तांनी भोळ्या शिव शंकराचे दर्शन घेतले. हर हर महादेवच्या गजरात भाविकांच्या पाऊलखुणा धानला येथील स्मशान भूमिच्या दिशेने चालले होते. उपस्थित माजी आमदार टेकचंद सावरकर, मौदा येथील नगराध्यक्ष प्रसन्ना राजाभाऊ तिडके, सरपंच ज्योती सावरकर, उपसरपंच अजय हारोडे, निशा सावरकर, मंगेश ठोंबरे, सूर्यकांत रोडे, व ग्रामपंचायत पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शिवभक्तांनी घेतला महाप्रसादाचा आस्वाद...!!!**

मौदा तालुक्यातील धानला येथील सुसज्ज स्मशान भूमीत निसर्गरम्य परिसरात गर्द हिरव्या गार परिसरात व शिवभक्तांनी अनेक भाविक भक्तांनी उपस्थित राहून पूजा केली. ग्रामपंचायत च्या वतीने व पदाधिकाऱ्यांनी भाविक भक्ताकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. परिसरातील हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## जनरल मिल्स इंडिया ने नाशिक येथे सुरू केला नवीन उत्पादन प्रकल्प



**नाशिक, दि. १५ फेब्रुवारी :** अमेरिकास्थित 'फॉर्च्युन ५००' खाद्य कंपनी जनरल मिल्स इन्क.चा एक भाग असलेल्या जनरल मिल्स इंडिया ने नाशिक येथे अत्याधुनिक उत्पादन केंद्राचे उद्घाटन केले. हा नवीन आणि अत्याधुनिक प्रकल्प कंपनीच्या भारतातील उत्पादन विस्ताराचा एक महत्त्वाचा टप्पा असून, वेगाने वाढणाऱ्या भारतीय अन्न आणि बेकरी क्षेत्राप्रती असलेली कंपनीची दीर्घकालीन वचनबद्धता पुन्हा अधोरेखित करतो.जनरल मिल्सने हा प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून, नाशिकमधील कंपनीची ही दुसरी उत्पादन सुविधा आहे. या प्रकल्पाची उभारणी प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाचे गुणवत्ता निकष वापरून करण्यात आली आहे, ज्यात अन्न सुरक्षा, उच्च गुणवत्ता आणि संसाधनांचा योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला आहे. नाशिकमधील हा नवीन प्रकल्प अधिक कार्यक्षम पुरवठा साखळी (सप्लाय चेन) सुनिश्चित करेल, ज्यामुळे मालाची ने-आण करण्यासाठी लागणारा वेळ कमी होईल. यामुळे देशभरात पिल्सबरी उत्पादनांची उपलब्धता वाढेल. या सुधारित उपलब्धतेमुळे भारतातील हजारो बेकरी व्यावसायिकांना पिल्सबरीच्या शाश्वत गुणवत्तेचा लाभ घेता येईल. परिणामी त्यांच्या स्वतःच्या प्रगतीला आणि एकूणच बेकरी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल. उत्पादनाच्या विस्तारा पलीकडे, या प्रकल्पामुळे या भागात महत्त्वपूर्ण आर्थिक परिणाम होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे उत्पादन, लॉजिस्टिक (मालवाहतूक) आणि सहाय्यक सेवांमध्ये आधीच अनेक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, ज्यामुळे महाराष्ट्रातील नाशिक परिसरातील स्थानिक उपजीविका आणि कौशल्य विकासाला चालना मिळाली आहे. शिवाय, कच्च्या मालाची आणि पूरक सेवांची वाढती मागणी स्थानिक पुरवठादार आणि व्यवसायांच्या वाढीला अधिक गती देईल. जनरल मिल्सच्या ग्लोबल इमर्जिंग मार्केट्स विभागाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बाल्की राधाकृष्णन यांनी सांगितले की, ङ्गनाशिकमधील आमच्या नवीन प्रकल्पाच्या उद्घाटनामुळे देशभर पिल्सबरी उत्पादनांची उपलब्धता वाढवताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो.

## विदर्भ साहित्य संघतर्फे गझल संध्या कार्यक्रम संपन्न



**नागपूर :** अभिजात मराठी व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई व विदर्भ साहित्य संघतर्फे आयोजित गझल संध्या कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध ज्येष्ठगझलकार व कवी बबन सराडकर यांनी आपल्या स्वरचित गझलांचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते उपस्थित होते. मराठी भाषेतील पहिल्या गझलकार म्हणून परिचित ज्येष्ठ कवयित्री आशा पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या गझल संध्येमध्ये पिंजरे झाले साऱ्या घरांचे, हा कसा आला जमाना , सध्या गवताच्या फुलण्याला सुख म्हटले मी , याद येते हरवलेल्या माणसांची याद येते , चोचीला चार कुठला ही कुणी विचारत नाही , शेती व मातीतल्या नात्यावर आधारित गझल तसेच वेदनांच्या डोंगराला लांधा तरी येत नाही आणि सत्वाच्या खडतर वाटेवर चालत गेलो अशा विविध आशयघन गझला सादर करण्यात आल्या. कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला व संपूर्ण वातावरण काव्यमय झाले.

# सपनेश्वर सिध्द शिव मंदीरात ३ हजार लीटर दुधाचे वाटप

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
वाडी, दि. १५



हिंदू धर्मातील प्रवित्र सण महाशिवरात्रीनिमीत्य वाडी परिसरातील शिवमंदिरात हर हर महादेवाच्या गजराने परिसर दुमदुमला.एम. आय. डी. सी. टी. पॉईट चौकातील श्री सपनेश्वर सिध्द शिव मंदीरात महाशिवरात्री निमीत्य तीन हजार लीटर मसाला दुध, साबुदाना खिजडी, प्रसाद हजारो भावीकांनी घेतला.
सर्वप्रथम सकाळी महारुद्रभिषेक करण्यात आला. आयोजनासाठी श्री संपनेश्वर सिद्ध शिवमंदीर समितीचे मुख्य प्रवर्तक सुरेश कुमकुमवार , मोहन पाठक, चंद्रशेखर ढाकरीया, राघोजी नागलवाडे, दिपक हिरणवार, सुभाष अंजीकर, विनोद बुरडकर, बबन हिरुडकर, सुरेश सिरसवार , अनिल बारई , गिरीश पांडेय ,नारायण कुमकुमवार, कमलेश हिरणवार, सुर्यकांत गिरमकर , सुनील बनकोटी , रमेश भंडारकर , प्रशांत शर्मा ,शोभा डाहाट , रमेश ठाकरे , विकास नायडू, बंटी दिक्षीत, पुजारी कैलाश मतलाने आदींनी सहकार्य केले. यावेळी आमदार समीर मेघे, नगराध्यक्ष नरेश चरडे, डॉ. संजय टेकाडे, नगरसेवक आनंदबाबू कदम, हर्षल काकडे, अश्विन बैस, कैलाश मंथापूरवार, संतोष केचे, रोहीत तिवारी, विजय मिश्रा, कपिल भलमे, अखिल पोहणकर, क्रांतीसिंग, दिनेश कोचे, प्रकाश कोकाटे, शैलेश थोराने, अश्विन बैस, राजेश थोराने, संदीप उमरेडकर उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/ 2008/26657
This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No. 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657
हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१